CMYK

८
रमजान मुबारक
आज का इफ्तार ६.३६
कल की सहेर ५.२५

# पार्श्वभूमी

रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही.
50% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.92 व 93 सारडा सेंट्रल, डी.पी.रोड,बीड.
Mob.9511511818

बीड वर्ष ३६ वे अंक ८९ वा फोन २३०१०१ दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ गुरुवार गंमत भंडारी ई-पेपर : www.parshvbhumi.com Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 पाने ६ किंमत ४रु.

# बीडच्या वृक्ष लागवडीचा विषय विधानसभेत गाजला
# मंत्री म्हणाले, एका दिवसात ६३ लाख झाडे लावली

## ९६% झाडे जिवंत असल्याचा दावा; आ.चेतन तुपेंनी विचारला प्रश्न




बीड दि.२५ (प्रतिनिधी):- बीड जिल्ह्यामध्ये ७ ऑगस्ट २०२५ ला तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीमध्ये जिल्हाधिकारी यांच्या नेतृत्वाखाली एकाच दिवसात ३० लाख झाडांची लागवड करण्यात आली परंतु यातील १०% झाडे जिवंत नसल्याची धक्कादायक माहिती आ.चेतन तुपे यांनी सभागृहात दिली. या वृक्ष लागवडीवर ४२ कोटी रुपयांची उधळपट्टी करण्यात आली. एका झाडासाठी ४० रुपये तर खड्डयासाठी १०० रुपये खर्च करण्यात आला. जनतेच्या पैशाचा हा अपव्यय असल्याचा आरोप तुपे यांनी केल्यानंतर मंत्र्यांनी दिलेले उत्तर ऐकून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. वनमंत्री गणेश नाईक म्हणाले ३० लाख वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट होते परंतु एका दिवसात ६३ लाख वृक्ष लागवड लावण्यात आले असून यातील ९६% झाडे जिवंत आहेत. एकंदरीतच ही सगळी आकडेवारी आणि झालेला खर्च पाहता काय चालले आहे यावर संताप नाही तर हसू येते.

### ६६ लाख वृक्ष लावले की नाही? हे पहायचे कसे?

बीडमध्ये ७ ऑगस्ट २०२५ रोजी एकाच दिवसात ६६ लाख वृक्षांची लागवड झाल्याची माहिती राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत दिली आहे. नाईक यांनी या बाबत जिल्हाधिकाऱ्यांचे कौतुकही केले. ते म्हणाले ३० लाख झाडे लावण्याचे उद्दिष्ट होते परंतु ६३ लाख झाडे लावण्यात आली आणि ९६% झाडे जिवंत आहेत. मुद्दा असा उपस्थित होतो की, ६३ लाख झाडे लावलीत की नाहीत? हे पहायचे कोणी व कसे? एका दिवसात एवढी झाडे लावता येतात का? एवढी मोठी सक्षम यंत्रणा त्या दिवशी कामाला लागली होती का? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी या वृक्ष लागवडीच्या प्रश्नावर आंदोलने केलेली आहेत.

बीडमधील ७ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या ३० लाख वृक्ष लागवडीचा मुद्दा हडपसरचे आ.चेतन तुपे यांनी उपस्थित केला. यात झाडे इतकी लावण्यात आली नाहीत, झाडापेक्षा तुतीच्या झाडांची संख्या जास्त असून लावलेल्या ३० लाख झाडांपैकी १०% झाडेही जिवंत नसल्याचा दावा चेतन तुपे यांनी केला आहे. आ.तुपे म्हणाले की, एका दिवसात एवढी झाडे लावली

पान २ वर



## आरटीई पोर्टलवर ७५ शाळांचा तात्काळ पुन:समावेश करावा

### पोद्दार शाळेचा आरटीई पोर्टलवर तात्काळ पुन:समावेश करावा – मनोज जाधव

बीड दि.२५ (प्रतिनिधी):- अल्पसंख्यांक दर्जा देण्यात आलेल्या आणि त्यानंतर निर्णय रद्द झालेल्या ७५ शाळांचा आरटीई पोर्टलवर तात्काळ



पुन:समावेश करण्यात यावा, अशी मागणी शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केली आहे. याबाबत त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अल्पसंख्यांक मंत्री, शिक्षण मंत्री, तसेच प्राथमिक शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना निवेदन सादर केले आहे. निवेदनात नमूद केल्यानुसार, काही शाळांना अल्पसंख्यांक दर्जा प्रदान करण्याच्या प्रक्रियेत गंभीर गैरव्यवहार झाल्याची शंका व्यक्त करण्यात आली होती. संबंधित शाळांच्या अल्पसंख्यांक दर्जाबाबत यापूर्वीच स्थगिती असतानाही काही तासांत प्रमाणपत्रांचे वाटप झाल्याचे समोर आले होते. पान २ वर

## खोक्याच्या पत्नीला आणि भावजईला चोरी करतांना अटक

### साडेतेरा लाखाचे सोने जप्त

बीड दि.२५ (प्रतिनिधी):- काही दिवसापुर्वी अनेक कारनामे बाहेर आल्यानंतर अटकेत असलेल्या खोक्या उर्फ सतीश भोसले याच्या पत्नीला आणि भावजईला चोरी करतांना पोलिसांनी अटक केली असून साडेतेरा लाख रुपयांचे सोने त्यांच्याकडून जप्त करण्यात आले आहे. वेगवेगळ्या प्रकरणात गुन्हे दाखल झाल्यानंतर खोक्या उर्फ सतीश भोसलेला पोलिसांनी अटक केलेली आहे. खोक्याने हरणाची हत्या केली असून अनेक वन्यजीवांची हत्या केल्याचा आरोपही त्याच्यावर आहे. पोलिसांनी त्याच्या पत्नीला आणि भावजईला चोरी प्रकरणात अटक केली असून साडेतेरा लाख रुपयांचे सोने व मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## प्रदीप फाटे सगळ्यांनाच फाट्यावर मारतोय तरीही बीडची यंत्रणा त्याला का झेलते?

# एसपी साहेब, उपोषणकर्ते अतिरेकी आहेत का?
## तुमच्या पोलिसांनी त्या लेकरांच्या डोक्यावरचा मंडपही काढला

### पोलिसांनी एवढीच ताकद फाटेच्या अटकेसाठी लावली असती तर तो काही तासात गजाआड दिसला असता

बीड पोलीस अधीक्षक कार्यालयासमोरच एका कुटुंबाला नातेवाईकांसह उपोषण करण्याची वेळ यावी ही बाब पोलीस प्रशासनाच्या दृष्टीने गंभीरच आहे. न्याय मिळत नसल्याने त्या कुटुंबाला ही भूमिका घ्यावी लागली, परंतु त्यांच्यावर ही वेळ पोलिसांमुळेच आलेली आहे. जाधवर यांचे कुटुंब उपोषणाला बसताच पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा मोठा फौजफाटा त्या ठिकाणी आला होता. उपोषणाला बसल्यापासून ते त्यांच्या डोक्यावरचा मंडप काढेपर्यंत पोलिसांनी त्या ठिकाणी मोठी ताकद लावली, हीच ताकद पोलिसांनी फाटेच्या अटकेसाठी लावली असती तर प्रदीप फाटे काही तासात गजाआड झाला असता आणि जाधवर कुटुंबावर उपोषण करण्याची वेळ सुद्धा आली नसती.

### पीआय बल्लाळ यांच्याकडून उपोषणकर्त्या महिलेवरच गुन्हे दाखल करण्याची धमकी

मयत सचिन जाधवर यांचे कुटुंब उपोषणासाठी एस.पी.ऑफीसला बसल्यानंतर त्या ठिकाणी शहर ठाण्याचे पो.नि.शीतलकुमार बल्लाळ यांनी तात्काळ धाव घेतली. उपोषणकर्त्यांशी चर्चा केली, मात्र नंतर बल्लाळ यांची भाषाही बदलली. मंडप काढण्यावरुन उपोषणकर्ते आणि पोलीस यांच्यात शाब्दिक चकमक झाली, यावेळी पीआय बल्लाळ यांनी उपोषणकर्त्या महिलेसह इतर सर्वांवर गुन्हे दाखल करु अशी धमकी दिली. लोकशाही मार्गाने एखादं कुटुंब न्याय मागण्यासाठी आंदोलन करत असेल तर त्यांना अशा प्रकारची धमकी कितपत योग्य आहे. विशेष म्हणजे जाधवर यांच्या पत्नीने ३-४ दिवसापुर्वी पोलीस प्रशासनाला त्याचे निवेदन सुद्धा दिले होते तरीही गुन्हे दाखल करण्याची भाषा म्हणजे एक प्रकारची दडपशाही असल्याच्या प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.




प्रकरणात गुन्हा दाखल होऊनही महिना झाला तरीही आरोपी प्रदीप फाटे तुमच्या पोलिसांना का सापडत नाही? फाटेला अटक होऊ नये म्हणून पोलीस प्रशासनावर कोणाचा दबाव आहे की काय? असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. पतीच्या आत्महत्येनंतर जाधवर कुटुंब उघड्यावर आले आहे. त्या पत्नीला आणि त्यांच्या मुलांना न्याय देईल एवढी सक्षम पोलीस यंत्रणा तुमच्याकडे नसावी याची खंत वाटते. आरोपी प्रदीप फाटेला अटक करावी म्हणून जाधवर यांच्या पत्नीला कुटुंब आणि नातेवाईकांसह उपोषण करण्याची वेळ यावी हे खरोखरच तुमच्या पोलीस यंत्रणेचे मोठे अपयश आहे. एवढं असुनही पोलीस पान २ वर

## बारावीच्या पेपरला १० विद्यार्थी रेस्टिकेट

बीड दि.२५ (प्रतिनिधी):- सध्या बारावीच्या परीक्षा सुरु आहेत, बुधवारी बारावीचा बायोलॉजीचा पेपर होता या पेपरला शहरातील केएसके महाविद्यालयात शिक्षण विभागाच्या पथकाने १० विद्यार्थ्यांवर रेस्टिकेटची कारवाई केल्याची माहिती शिक्षण विभागाने दिली आहे. आतापर्यंत एकूण ३३ विद्यार्थ्यांवर ही कारवाई करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

### शिरुरमधील कॉपीचे व्हिडीओ व्हायरल

शिरुर शहर व तालुक्यातील वेगवेगळ्या परीक्षा केंद्राबाहेर पालक व कॉपी पुरविणाऱ्यांची मोठी गर्दी झाली होती. तळमजल्यावरील वर्गाच्या खिडकीच्या बाहेर अनेकजण कॉपी पुरवितांनाचे व्हिडीओ देखील व्हायरल झाले आहेत. दुसऱ्या मजल्यावर असलेल्या हॉलमध्ये कॉपी पुरविण्यासाठी चक्क पान २ वर

### चौसाळा परीक्षा केंद्रावरील ५ शिक्षकही निलंबीत

चौसाळा येथील कॉलेजच्या बारावीच्या परीक्षा केंद्रावर झालेल्या कॉपीच्या प्रकरणात एकूण १७ शिक्षकांवर गुन्हे दाखल झालेले आहेत. पान २ वर

### बीडमध्ये कामकाज बंद ठेवून वकिलांचे ठिय्या आंदोलन

## वकिलास मारहाण प्रकरणी आज महाराष्ट्रातील अडीच लाख वकील कामकाज बंद ठेवणार





बीड दि.२५ (प्रतिनिधी):- येथील न्यायालयाच्या परिसरामध्ये विधिज्ञ राम डोंगरे यांना झालेल्या मारहाण प्रकरणी आरोपींवर गुन्हा दाखल करुन अटक करण्यासाठी शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर हे टाळाटाळ करत असल्याच्या निषेधार्थ वकिलांनी बुधवारी सकाळपासूनच न्यायालयाच्या पायऱ्यावर कामकाज बंद ठेवून ठिय्या आंदोलन केले. दुपारी २ वाजता मारहाण करणाऱ्या आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन महाराष्ट्रातील सर्व न्यायालयातील वकील आज कामकाज बंद ठेवून या घटनेचा निषेध नोंदविणार आहेत. दरम्यान बार कौन्सिलचे माजी अध्यक्ष ॲड.वसंत दिगंबरराव सोळंके यांनी देखील महाअधिवक्ता यांची भेट घेऊन आरोपींवर तात्काळ कारवाईची मागणी करत ॲडव्होकेट संरक्षण बिल मंजूर करुन त्याचे कायद्यात रुपांतर करावे अशी मागणी केली आहे. बीडमधील न्यायालय परिसरामध्ये ॲड.राम डोंगरे यांना मारहाण झाल्यानंतर वकील पान २ वर

### आयुष मंत्रालयाचा मानाचा सन्मान

## वैद्य शिवप्रसाद चरखा यांची राष्ट्रीय आयुर्वेद गुरूपदी निवड

बीड दि.२५ (प्रतिनिधी):- भारत सरकारच्या आयुष मंत्रालय अंतर्गत कार्यरत असलेल्या राष्ट्रीय आयुर्वेद विद्यापीठ, दिल्ली यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या गुरू-शिष्य परंपरा या उपक्रमांतर्गत बीडचे आयुर्वेद



तज्ज्ञ वैद्य शिवप्रसाद चरखा यांची राष्ट्रीय आयुर्वेद गुरू म्हणून निवड करण्यात आली आहे.
या उपक्रमासाठी संपूर्ण देशातून केवळ ९९ आयुर्वेद तज्ज्ञांची निवड करण्यात आली असून, त्यामध्ये वैद्य चरखा यांचा समावेश झाला आहे. ही निवड अत्यंत कडक निकषांच्या आधारे करण्यात येते. वैद्यकीय अनुभव, पारंपरिक आयुर्वेद ज्ञान, रुग्णसेवा, संशोधन आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची क्षमता या सर्व बाबींचा विचार करून राष्ट्रीय स्तरावर तज्ज्ांची निवड केली जाते. गुरू-शिष्य परंपरा ही प्राचीन भारतीय शिक्षण पद्धती जपण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेली योजना आहे. या योजनेअंतर्गत निवड झालेल्या गुरूंना ठरावीक कालावधीसाठी शिष्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्याची जबाबदारी दिली जाते. आयुर्वेद शास्त्रातील सैद्धांतिक ज्ञानासोबतच व्यावहारिक उपचार पद्धती, निदान तंत्र, औषधनिर्मिती पान २ वर

# माजलगावचे सर्व नगरसेवक विकासासाठी एकत्र आले

### न.प.ची पहिली सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न

माजलगाव दि.२५ (प्रतिनिधी):- माजलगाव नगरपरिषद निवडणुकीपासून ते आज पर्यंत आरोप प्रत्यारोपाने गाजल्याने नगरपरिषदेकडे जिल्ह्याचे लक्ष लागले होते परंतु अखेर नवनिर्वाचित नगरसेवक शहराच्या विकासाच्या मुद्द्यावर एकत्र येऊन नगर पालिकेची पहिली सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणामध्ये पार पडली. या सभेचे अध्यक्षस्थान नगराध्यक्ष महरीन शिफा बिलाल चाऊस यांनी भूषविले. यावेळी उपनगराध्यक्ष सहाल भैय्या चाऊस, मुख्याधिकारी सुंदर बोंदर तसेच सर्व नगरसेवक, नगरसेविका आणि पालिकेतील विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.
सभेच्या प्रारंभी नगराध्यक्षांनी सर्व सदस्यांचे स्वागत करत शहराच्या सर्वांगीण विकासासाठी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले. माजलगाव शहराचा सर्वंकष विकास, स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरुस्ती,



पथदिवे, आरोग्य सेवा आणि मूलभूत सुविधांचा दर्जा उंचावणे ही आपली प्राथमिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले. पान २ वर

# बार्शी नाका २० दिवसांपासून तहानलेलाच

- वॉल्वमॅनची टाळाटाळ
- नागरिकांचा संताप
- नगरपालिकेच्या ढिसाळ कारभारावर तीव्र टीका

बीड दि.२५ (प्रतिनिधी):- बीड शहरातील बार्शी नाका परिसर गेल्या २२ दिवसांपासून पिण्याच्या पाण्याविना तहानलेला आहे. मागील काही महिन्यांपासून शहरातील पाणीपुरवठ्याचे नियोजन पूर्णपणे कोलमडले असून, आठ दिवसांनी होणारा पाणीपुरवठाही आता थेट २२ दिवसावर आला आहे. पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांची अक्षरश: भटकँती सुरू आहे.
शहरातील बार्शी नाका, इमामपूर रोड, ढगे कॉलनी, बाजीराव नगर, पूनम गल्ली, बिलाल नगर, प्रकाश आंबेडकर नगर, राहुल नगर, दुधाळ कॉलनी, हिना पेट्रोल पंप समोरील भाग, या भागांतील हजारो नागरिकांना गेल्या तीन आठवड्यांपासून पिण्याच्या पाण्यासाठी दररोज संघर्ष करावा लागत आहे. विहिरी, बोअरवेल आणि पान २ वर

### रात्री अपरात्री पाणीपुरवठा; नागरिकांची झोप उडाली

बार्शी नाका भागातील काही भागांत रात्री दोन ते तीन वाजण्याच्या सुमारास पाणी सोडले जात असल्याची तक्रार आहे. नागरिकांना पाण्यामुळे मध्यरात्रीपर्यंत जागरण करावे लागत आहे. त्यामुळे महिलांना व ज्येष्ठ नागरिकांना झोपेचा त्याग करून पाणी साठवावे लागत आहे. दिवसा नियोजित वेळेत पाणीपुरवठा करावा, अशी ठाम मागणी नागरिकांकडून होत आहे.

## स्वातंत्र्य सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समितीच्या सचिवपदी सुनील क्षीरसागर यांची निवड





बीड दि.२५ (प्रतिनिधी):- अहिल्यानगर - बीड - परळी वैद्यनाथ या रेल्वे मार्गाच्या कामाला गती मिळावी तसेच शहरी भागासह ग्रामीण भागामध्ये रेल्वे कामात निर्माण होणे अडथळे प्रशासकीय पातळीवर बैठका घेणे त्याचबरोबर निधी संकल्पसाठी निवेदने सादर करणे यासह अन्य न्याय हक्कासाठी स्वातंत्र्य सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समिती मागील अनेक वर्षापासून कार्यरत आहे.

पान २ वर

CMYK

## हवाई वाहतूक ही अत्यंत महत्त्वाची आणि गांभीर्यची बाब– खा. सुप्रिया सुळे

नवी दिल्ली दि. २५ (वृत्तसेवा):- मी विमान वाहतूक मंत्रालय यांचे आभार मानते. रोहित पवार यांनी हा विषय मुद्देसूद मांडला. आमच्या घरातील पुत्र गेला आहे. हे दुःख पाच कुटुंबातील लोकांच आहे. ही वेळ दुसऱ्या कोणावर येऊ नये ही पांडुरंगाकडे प्रार्थना करते. अशा घटना घडत असतील तर तपासणी झाली पाहिजे असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्षा तथा महाराष्ट्राच्या खासदार सुप्रियाताई सुळे यांनी नवी दिल्ली येथे पत्रकारांशी संवाद साधताना म्हटले आहे. सुप्रियाताई सुळे बोलताना म्हणाल्या की, रोहित पवार, जय पवार यांनी हा विषय लावून धरला. हवाई वाहतूक ही अत्यंत महत्त्वाची आणि गांभीर्यची बाब आहे. ही एक सुरुवात आहे. मला हा पहिला रिपोर्ट आहे असं वाटतं. विमान वाहतूक मंत्री हे व्यवस्थित तपास करण्याच्या सूचना देतील. रोहित पवार यांच्या भावना समजू शकते. आमच्या घरात सगळे अस्वस्थ झाले आहेत.

पान १ वरून

### बीडच्या वृक्ष लागवडीचा विषय विधानसभेत गाजला

कशी? हा संशोधनाचा विषय आहे. एका झाडासाठी ४० रुपये तर एका खड्ड्यासाठी १०० रुपये दिले गेले. ४२ कोटी रुपये यासाठी खर्च करण्यात आले परंतु ही झाडे जिवंत नाहीत. जनतेच्या पैशाची ही उधळपट्टी आहे. या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई होणार आहे की नाही? चौकशी समिती गठीत करणार आहे की नाही? कोणकोणत्या प्रकारची झाडे लावली गेली, या सर्वांची माहिती देण्यात यावी अशी मागणी आ. तुपे यांनी केल्यानंतर त्यांच्या या प्रश्नाला राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी उत्तर दिले. ते म्हणाले की, ३० लाख झाडे लावण्याचे उद्दिष्टय होते परंतु एका दिवसात ६६ लाख झाडे लावण्यात आली. यातील ९६% झाडे जिवंत आहेत. कुठेही गैरप्रकार झाला नाही, काही भागात झाल्याची माहिती असेल तर त्याचे पुरावे द्यावेत, दोषींवर कारवाई केली जाईल असे वनमंत्र्यांनी सांगितले. मात्र वनमंत्र्यांच्या या उत्तराने आमदार महोदयांचे समाधान झाले नाही. बीड जिल्ह्यात एका दिवसात लावलेल्या ६३ लाख झाडांचा मुद्दा बुधवारी विधानसभेत चांगलाच गाजला. विशेष म्हणजे जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी यावर काहीही बोलत नसतांना पुण्यातील आ. चेतन तुपे यांनी हा मुद्दा उपस्थित केला व अनेक प्रश्न सरकारला विचारले आहेत.

### माजलगावचे सर्व नगरसेवक एकत्र

यावेळी मुख्याधिकारी सुंदर बोंदर यांनी पालिकेच्या आर्थिक स्थितीचा आणि प्रलंबित विकास कामांचा आढावा सादर केला. विविध विभाग प्रमुखांनीही आपल्या विभागांअंतर्गत सुरू असलेल्या योजना, अडचणी आणि पुढील नियोजन याबाबत माहिती दिली. शहरातील स्वच्छता मोहीम अधिक प्रभावी करण्यासाठी विशेष कृती आराखडा तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक दुरुस्ती आणि उपाययोजनांना प्राधान्य देण्याचे ठरविण्यात आले.

सभेदरम्यान काही सदस्यांनी शहरातील प्रभागनिहाय समस्या मांडत नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याची मागणी केली. त्यावर नगराध्यक्षांनी सर्व प्रस्तावांचा सकारात्मक विचार करून टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

नगरपालिकेच्या पहिल्या सर्वसाधारण सभेत विकासाभिमुख आणि लोकहिताच्या निर्णयांवर भर देण्यात आला. यामुळे माजलगाव शहराच्या विकास प्रक्रियेला वेग येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### आरटीई पोर्टलवर ७५ शाळांचा समावेश करावा

या प्रकरणाची दखल घेत माननीय मुख्यमंत्र्यांनी संबंधित निर्णयास स्थगिती दिली आहे.

दरम्यान, सध्या राज्यात आरटीई प्रवेश प्रक्रिया सुरू असून पालकांकडून अर्ज सादर केले जात आहेत. मात्र, नियमबाह्य पद्धतीने अल्पसंख्यांक प्रमाणपत्र देण्यात आलेल्या ७५ शाळांची नावे आरटीई पोर्टलवरून वगळण्यात आले आहेत यात बीड जिल्ह्यातील पोद्दार शाळेचा देखील समावेश आहे. त्यामुळे या शाळेत आरटीई मार्फत आपल्या पाल्याचे प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या पालकांना अर्ज प्रक्रियेत अडचणी येत आहेत. अनेक आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू कुटुंबांतील विद्यार्थ्यांच्या प्रवेशप्रक्रियेत नुकसान होत असल्याची बाबही पुढे आली आहे.

ज्या तत्परतेने संबंधित शाळांना अल्पसंख्यांक दर्जा देऊन त्यांची नावे आरटीई पोर्टलवरून वगळण्यात आली, त्याचप्रमाणे निर्णय रद्द झाल्यानंतर त्या शाळांचा आरटीई पोर्टलवर तात्काळ पुनःसमावेश व्हावा, अशी मागणी मनोज जाधव यांनी केली आहे. शासनाने याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन संबंधित विभागास आवश्यक सूचना द्याव्यात, असेही त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

आरटीई प्रवेश प्रक्रियेत पारदर्शकता राखून सर्व विद्यार्थ्यांना समान संधी मिळावी, हीच या मागणीमागील भूमिका असल्याचे जाधव यांनी स्पष्ट केले.

### वैद्य शिवप्रसाद चरखा यांची निवड

आणि रुग्ण व्यवस्थापन यांचे मार्गदर्शन केले जाते.

वैद्य शिवप्रसाद चरखा यांनी दीर्घकाळ आयुर्वेद क्षेत्रात कार्य करत अनेक रुग्णांना उपचार दिले आहेत. त्यांच्या अनुभवाचा लाभ आता देशभरातील निवडक विद्यार्थ्यांना मिळणार आहे. त्यांच्या या निवडीमुळे बीड जिल्ह्याचा गौरव वाढला असून, आयुर्वेद क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### कॉपीचे व्हिडीओ व्हायरल

मोठ्या काठीचा वापर करण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. काठीला कॉपीचे बंडल बांधून ते पुरवितांनाचे व्हिडीओ व्हायरल झाल्याचे खळबळ उडाली आहे.

### चौसाळा परीक्षा केंद्रावरील ५ शिक्षकही निलंबीत

या प्रकरणातील १२ शिक्षकांना यापुर्वीच निलंबीत करण्यात आले होते. याच प्रकरणात बुधवारी पारनेरकर विद्यालयातील ५ शिक्षकांवर निलंबनाची कारवाई करण्यात आल्याचे शिक्षण विभागाने सांगितले. त्याच बरोबर बीड तालुक्यातील कुर्ला येथील परीक्षा केंद्रावर मंडप टाकून परीक्षा घेतल्या प्रकरणाची शिक्षण विभागाने गंभीर दखल घेत केंद्र संचालक अभिषेक राऊत यांना निलंबित केले आहे.


## जाहीर प्रगटन

**मा.श्री.व्ही.एच. पाटवदकर साहेब, जिल्हा न्यायाधीश –१, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २९७/२०२४**

**सचिन वडतीले व इतर वि. छबू लक्ष्मण चांदणे व इतर**

प्रति, (गैरअर्जदार) :

2. **Sakhubai w/o Laxman Chandane,**
   Age-64 years, Occup. Occup. Labour Household,
   R/o Bahirwadi, Tal Dist. Beed. Now R/o. Rajuri (Navgan), Tql Dist. Beed.
4. **Dadasaheb S/o Laxman Chandane,**
   Age-21 years, Occup. Labour,
   R/o. Bahirwadi, Tql Dist. Beed. Now R/o.Kala Hanuman Thana, Beed. Tal Dist. Beed.
8. **Smt. Seema W/o Babasaheb Dodake,**
   Age-26 years, Occup. Household,
   R/o. Bahirwadi, Tql Dist. Beed. Now R/o. Kala Hanuman Thana, Beed. Tal Dist. Beed.
9. **Smt. Neeta Savita W/o Bandu Galphade,**
   Age-22 years, Occup. Household,
   R/o. Bahirwadi, Tql Dist. Beed. Now R/o. Kala Hanuman Thana, Beed. Tal Dist. Beed.
11. **Ganesh S/o Kashinath Pawar,**
   Age-47 years, Occup. Agriculture Business
   R/o. Mali Ves, Subhash Road, Beed Tql Dist. Beed.

**अर्जदारातर्फे : ॲड बी.बी.मोरे**

ज्याअर्थी अर्जदार **सचिन अर्जुन वडतीले व इतर वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. हिरालाल चौक, बूरूड गल्ली, बीड. ता. जि. बीड.** यांनी आपणा विरूध्द कलम ५ लिमीटेशन कायदयान्वये विलंब माफीचा अर्ज दाखल केलेला असुन तो या न्यायालयात नोंदविण्यात आलेला आहे आणि या प्रकरणाच्या सुनावणीसाठी **दिनांक २०/०३/२०२६** ही तारीख न्यायालयाने निश्चित केलेली आहे. तुमच्या तर्फे तुम्ही स्वतः किंवा तुमचे वकील किंवा तुमचे काम चालविण्यास विधीद्वारे प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती हजर झाली नाही तर तुमच्या गैरहजेरीत सदरील प्रकरणाची सुनावणी होउन निकाल देण्यात येईल.

ज्याअर्थी कोणास यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून (३०) तीस दिवसांच्या आत या न्यायालया समोर स्वतः किंवा वकिलामार्फत हजर रहावे, अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल.

आज दिनांक २४/०२/२०२६ रोजी साझे सहिने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**प्रकरणातील पूढील तारीख २०/०३/२०२६.**

**– आदेशावरून–**
**अधिक्षक**
**जिल्हा न्यायालय, बीड**

16567-13457


### अडीच लाख वकील आज कामकाज बंद ठेवणार

बांधव आक्रमक झाले, त्यांनी या प्रकरणात शिवाजी नगर पोलीस ठाणे गाठून तक्रार देऊन एफआयआर दाखल करण्याची मागणी केली होती परंतु पोलिसांनी ही मागणी सुरुवातीला फेटाळली. परंतु दुसऱ्या दिवशी दुपारी २ वाजता आरोपी राधाकिसन रामचंद्र करपे, सुरेश नवनाथ भोसले, माया अरुण कांबळे, दोन अज्ञात महिला व बॉबी (पूर्ण नाव माहित नाही) यांच्या विरुद्ध शिवाजी नगर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता नुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांनी वकिलांना अपमानास्पद वागणूक दिली, उलट त्यांच्यावरच गुन्हे दाखल करण्याची धमकीवजा भाषा केली असा आरोप वकील संघाच्या वतीने करण्यात आला आहे. दरम्यान या प्रकरणात आ.विजयसिंह पंडित, महाराष्ट्र नोटरी असोसिएशनचे अध्यक्ष सय्यद सिकंदरअली व बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र गोवाचे माजी अध्यक्ष मोतीसिंह मोहता, ॲड.नरसिंह जाधव यांनी पोलीस अधीक्षक यांच्याशी घटनेच्या गांभीर्या बाबत चर्चा करुन आरोपींना त्वरीत अटक करण्याची मागणी केली आहे. मोतीसिंह मोहता यांनी सांगितले की या घटनेचा निषेध म्हणून महाराष्ट्रातील अडीच लाखापेक्षा जास्त वकील बांधव आज कामकाज बंद ठेवून या घटनेचा निषेध करणार आहेत.

### प्रदीप फाटे सगळ्यांनाच फाट्यावर मारतोय

यंत्रणा जागची हलली नाही, उलट जाधवर यांच्या पत्नीने उपोषणाला बसू नये यासाठी पोलीस प्रशासनाने अख्खी ताकद लावली एवढंच काय जाधवर यांच्या पत्नी लेकराबाळांसह उपोषणाला बसल्या तिथे उन्हापासून बचाव करण्यासाठी टाकलेला मंडप सुद्धा तुमच्या पोलिसांनी काढून टाकला, यामुळे बीडच्या पोलीस प्रशासनात कायद्याच्या पलिकडे असलेली माणुसकी सुद्धा नाही हे ही दिसून आले. प्रदीप फाटे हा कोणी कुख्यात गुंड नाही, तो एक साधा जीएसटी अधिकारी आहे, तरीही महिना होऊन तो पोलिसांना सापडत नाही. प्रदीप फाटे हा सगळ्यांनाच फाट्यावर मारतोय तरी सुद्धा बीडची यंत्रणा त्याला एवढी का झेलते? असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. प्रदीप फाटेला पोलीसच वाचवत असल्याचा आरोप मयत सचिन जाधवर यांच्या पत्नी मयुरी जाधवर यांनी केला आहे. बुधवारी सकाळपासूनच जाधवर कुटुंब आणि नातेवाईक एस.पी.ऑफीस समोर उपोषणाला बसले. त्यानंतर त्या ठिकाणी मंडप लावण्यात आला, मात्र पोलिसांनी तो मंडप काढून टाकला. आधीच जाधवर यांच्या लेकराबाळांच्या डोक्यावरील पित्याचे छत्र हरवले आहे. त्यात आता त्याच लेकराबाळांच्या डोक्यावरील मंडप काढून पोलिसांनी नेमके काय साधले? असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.

### बार्शी नाका २० दिवसांपासून तहानलेलाच...

खाजगी टँकर यांच्यावर अवलंबून राहण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.

वॉल्वमॅनकडून कारणांची सरबत्ती

पाणीपुरवठ्याबाबत वाल्मनकडे विचारणा केली असता पाईपलाईन फुटली, मोटार जळाली, तांत्रिक बिघाड आहे अशी विविध कारणे सांगून वेळकाढूपणा केला जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. मात्र २२ दिवस उलटूनही ठोस उपाययोजना न झाल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

खाजगी टँकरवाल्यांकडून लूट

उन्हाळ्याची चाहूल लागताच खाजगी टँकरवाल्यांनी दरात मोठी वाढ केली आहे. सव्वा-दोनपट दराने पाणी विकले जात असून, सामान्य नागरिकांची आर्थिक कोंडी होत आहे. प्रशासनाच्या निष्क्रियतेचा फटका थेट नागरिकांना बसत असल्याचे चित्र आहे.

निवडणूक आश्वासने हवेत?

नगरपालिका निवडणुकीवेळी दिलेली पाणीपुरवठ्याची आश्वासने अद्याप कागदावरच राहिली आहेत. क्या हुआ तेरा वादा अशी चर्चा नागरिकांमध्ये रंगत आहे. स्थानिक नगरसेवकांनी तात्काळ हस्तक्षेप करून ठोस भूमिका घ्यावी, अशी मागणी होत आहे.

मुख्याधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करावा

नागरिकांनी नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांनी तातडीने पाणीपुरवठ्याचे नियोजन सुधारून नियमित व सुरळीत पाणी देण्याची मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात येत आहे.

पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत गरजेकडे दुर्लक्ष करणे ही गंभीर बाब असून, नगरपालिकेच्या ढिसाळ व बेफिकीर कारभारावर नागरिकांकडून कडक शब्दांत ताशेरे ओढले जात आहेत. आता तरी प्रशासन जागे होणार का, हा प्रश्न बार्शी नाका परिसरातील तहानलेल्या जनतेसमोर उभा आहे.

### रेल्वे मागणी आंदोलन समितीच्या सचिवपदी सुनील क्षीरसागर यांची निवड

या समितीच्या नूतन कार्यकारणी मध्ये अध्यक्षपदी जवाहरलाल सारडा यांची नियुक्ती झालेली होती. त्यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि. २५) बैठक संपन्न झाली. या बैठकीत सर्वानुमते दैनिक चंपावतीपत्रचे संपादक सुनील नामदेवराव क्षीरसागर यांची सचिवपदी नियुक्ती करण्यात आली.

स्वातंत्र्य सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समिती जिल्हा बीड ची बीड शहरामध्ये समितीचे सदस्य अरुण डाके यांचे निवासस्थानी बुधवारी बैठक संपन्न झाली. यावेळी अध्यक्ष जवाहरलाल सारडा, सचिव सुनील क्षीरसागर, शांतीलाल पटेल, विष्णुदास बियाणी, रामचंद्र जोशी, अशोक म. शेटे, शिवाजी बन्सी जाधव, सय्यद नवीदुजम्मा, रवी उबाळे, अरुण बाबासाहेब डाके, महम्मद लईक अहेमद, भास्करराव जाधव, तुकाराम साळुंके, विलासराव बडगे, वाय जनार्दन राव, सखाराम मस्के, वैभव स्वामी आदी उपस्थित होते.

जिल्ह्यातील नगर - बीड - परळी या जिव्हाळ्याच्या रेल्वे मार्गासाठी दैनिक चंपावती पत्रचे संपादक स्व. नामदेवराव क्षीरसागर यांनी लेखणीच्या माध्यमातूनच स्वातंत्र्य सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समिती जिल्हा बीड माध्यमातून रस्त्यावर उतरून आंदोलनासह प्रशासकीय पातळीवर देखील भरीव कामगिरी करत बीडकर यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी कार्य केले होते. या बैठकीमध्ये त्यांच्या कार्याचा उल्लेख करत उपस्थित त्यांनी त्यांच्या कार्याची दखल घेत आणि समितीच्या आजपर्यंतच्या कार्याचा अनुभव असणारे त्यांचे चिरंजीव दैनिक चंपावती पत्र चे संपादक सुनील नामदेवराव क्षीरसागर यांची सचिव पदी नियुक्ती करण्याचा ठराव मांडण्यात आला. यासाठी समितीचे सदस्य विलासराव बडगे यांनी ठराव मांडला यास अरुण डाके आणि वाय जनार्दन राव यांनी अनुमोदन देत सर्वानुमते ठराव पास करत सचिव पदी सुनील नामदेव क्षीरसागर यांची नियुक्ती करण्यात आली. या निवडीबद्दल उपस्थितांनी सुनीलराव क्षीरसागर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

गतीने कामकाज केले जाईल -सुनील क्षीरसागर

बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणि सामाजिक समतोल राखण्यासाठी दैनिक चंपावती पत्र ची स्थापना १९६५ मध्ये स्व नामदेवराव क्षीरसागर म्हणजेच माझे वडील यांनी केली. जिल्ह्याच्या सामाजिक आर्थिक राजकीय विकास सर्वच पातळीवर दैनिक चंपावती पत्र या माध्यमातून माझ्या वडिलांनी लेखणी च्या बळावर जिल्ह्याचा नावलौकिक वाढवला. दरम्यान बीडकर यांच्या जिव्हाळ्याचा विषय असणारा नगर बीड परळी रेल्वे मार्गासाठी स्वातंत्र्य सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समिती जिल्हा बीड ची स्थापना केली १९८३ पासून या समितीच्या माध्यमातून त्यांनी रेल्वे कामाच्या प्रगतीसाठी पाठपुरावा वेळप्रसंगी आंदोलनात देखील सक्रिय सहभाग नोंदवला. त्यांच्याच या कार्याची दखल आणि त्यांच्या समवेत केलेल्या कामाचा माझा अनुभव पाहता समितीने सचिव पदी निवड केली येणाऱ्या काळातही त्याच ताकतीने आणि गतीने समितीचे कामकाज केले जाईल अशी ग्वाही सचिव पदी निवड झाल्याबद्दल सुनीलराव क्षीरसागर यांनी दिली. यावेळी त्यांनी सचिव पदी निवड केल्याबद्दल सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानले.

# शुक्लतीर्थ व वांगी देवस्थानसाठी ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर

## – डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या पाठपुराव्याला यश–

दिंद्रुड दि.२५ (प्रतिनिधी) :- आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ.ओमप्रकाश शेटे यांनी २०२३ पासून केलेल्या प्रामाणिक पाठपुराव्याला यश आले. आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजनेअंतर्गत संत नारायण बाबा देवस्थान वांगी व श्री क्षेत्र शुक्लेश्वर देवस्थान मौजे शुक्लतीर्थ लिमगाव ता.माजलगाव येथील दोन्ही देवस्थानासाठी जवळपास तब्बल पाच कोटी रुपयांच्या आसपास निधी मंजूर करून प्रशासकीय मान्यता देण्यात आली. याबद्दल डॉ. शेटे यांनी मुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री व सरकारचे आभार मानले आहेत. माजलगाव तालुक्यातील श्रीक्षेत्र शुक्लतीर्थ लिमगाव हे ऐतिहासिक व पुण्यपावन धाम म्हणून प्रसिद्ध आहे. हे देवस्थान तीर्थक्षेत्र ब मध्ये येण्यासाठी डॉ.शेटे यांचे मोलाचे योगदान आहे. येथे दरवर्षी लाखो भाविक दर्शनासाठी येत असतात. तसेच दशक्रिया विधी करण्यासाठी येणाऱ्या कुटुंबांची संख्याही मोठी आहे. मात्र सोयी सुविधांचा अभाव असल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणात विकास कामे अपेक्षित होती. त्यासाठी डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा केला होता, आज या पाठपुराव्याला यश आले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना (ब वर्ग) अंतर्गत २ कोटी ७८ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यामध्ये प्रसादालय, सभामंडप, भक्त निवास, महिला व पुरुषांसाठी शौचालय आदी विकास कामे केली जाणार आहेत. वैकुंठवासी संत नारायण बाबा देवस्थान वांगी या तीर्थक्षेत्रालाही डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या प्रयत्नाने तीर्थक्षेत्र ब चा दर्जा मिळाला होता. पंचक्रोशीतील जवळपास ६० गावांमध्ये या देवस्थानचा भक्त व शिष्य परिवार आहे. जागृत देवस्थान असलेल्या या देवस्थानला वर्षभरात लाखोंच्या संख्येने भाविक भक्त दर्शनासाठी येतात. या ठिकाणी हे मोठ्या प्रमाणात विकास कामे अपेक्षित आहे. त्यासाठी येथे मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता होती. डॉ. शेटे यांनी मुख्यमंत्री महोदयांकडे पाठपुरावा करून २ कोटी ०३ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करून आणला आहे. यामध्ये सांस्कृतिक सभागृह, भोजन कक्ष, महिला व पुरुषांसाठी शौचालय, संरक्षक भिंत, पेवर ब्लॉक आदी विकास कामे केली जाणार आहेत.



### देवस्थाने सामाजिक स्वास्थ अबाधित ठेवतात –डॉ.ओमप्रकाश शेटे

**माजलगाव विधानसभा मतदारसंघातील दोन्ही देवस्थानच्या विकासाकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे व सरकारने दिलेली ही मदत अनमोल आहे. खऱ्या अर्थाने, अशी देवस्थाने दरवर्षी अखंड हरिनाम सप्ताहाद्वारे जिल्ह्यातील सामाजिक स्वास्थ्य अबाधित राखण्यासोबतच जातीयतेची दरी कमी करण्यात मदत करतात. या धार्मिक संस्थानांचा विकास करणे सर्वांची जबाबदारी आहे.**

पान ६ वरून

### भगवानबाबा प्रतिष्ठाणवर तुकाराम महाराज यांचे कीर्तन

ह.भ.प. स्वामी शिवरुद्रानंद महाराज यांचे प्रवचन तर सायंकाळी ६.३० ते ते ८.३० वेळात ह.भ.प. तुकाराम महाराज मुंडे, परळी यांचे कीर्तन होणार आहे. श्रीसंत भगवानबाबा प्रतिष्ठानवर आयोजित प्रवचन व कीर्तनाचा भाविकांनी मोठ्या संख्येने भाग घ्यावा, असे आवाहन सप्ताह समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

### जिल्हापरिषदेत लोकप्रतिनिधी नसल्याने प्रशासकीय अधिकाऱ्यांचा मनमानी

तर जिल्हा परिषद नविन प्रशासकीय इमारतीमध्ये फर्निचर व विविध कामे करणे या कामासाठी ६ लाख ८६ हजार २७१ रुपयांची प्रशासकीय मान्यता अर्थात कार्यारंभ आदेश दिलेला आहे.जिल्हा परिषदेत २०२३ पासुन प्रशासक असल्याने आधिका-यांवर कोणाचाही वचक राहिलेला नाही.त्यामुळे अधिकारी मर्जीतील कंत्राटदार पोसण्यासाठी निधी खर्च करताना दिसत आहेत. एकीकडे जिल्हा परिषदेच्या मुख्य ईमारतीला संरक्षण भिंत नाही जी होती पोलिस अधीक्षक कार्यालयाजवळ ती पाडण्यात आली. वास्तविक पाहता ही भिंत तातडीने बांधणे आवश्यक आहे.मात्र असे न करता पंचायत समितीतील अधिकारी कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाला संरक्षण भिंत बांधण्याचा घाट आधिका-यांनी घातला आहे.जिल्हा परिषद आवारात ज्या ठिकाणी लाईटचे मीटर आहे त्याठिकाणी एक छोटी फर्निचरची खोली करण्यात येणार आहे.व विविध कामांमध्ये जिल्हा परिषदेच्या गेट समोरील मोकळ्या जागेत तारेचे कंपाऊंड आणि हिरवळ करण्यात येणार आहे मात्र मुळात निवडण्यात आलेली जागाच चुकीची असुन लोकप्रतिनिधी नसल्याने आणि केवळ प्रशासकीय राज असल्याने अधिकारी मनमानी कारभार करत असल्याचे दिसून येत असुन संबंधित प्रकरणात सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी याबाबत सीईओ जितिन रहेमान आणि जिल्हाधिकारी नवनित कांवत यांना लेखी तक्रारी द्वारे अनावश्यक बाबी टाळुन आवश्यक त्या ठिकाणी निधीचा वापर करण्याची विनंती केली आहे.

### स्त्री भ्रूणहत्या थांबवण्यासाठी केवळ कायदे नाही,तर समाजाचाही पुढाकार आवश्यक

आहे.यासोबतच, अल्पवयीन मुलींची लग्ने हा देखील गंभीर सामाजिक प्रश्न आहे. माझ्या जिल्ह्यात लग्नसराईच्या काळात अशा घटना आढळतात. प्रशासनाने हेल्पलाईन सुरू केली असली तरी समाजात अजूनही भीती व संकोच आहे. त्यामुळे सामाजिक जागरूकता वाढवणे अत्यंत आवश्यक आहे. अशी भूमिका सभागृहात मांडली.स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी शासन, प्रशासन,लोकप्रतिनिधी आणि समाज यांनी एकत्र येऊन ठोस पावले उचलली तरच भविष्यातील मोठा धोका आपण टाळू शकतो.आपल्या समाजातील प्रत्येक मुलगी ही कुटुंबाचा अभिमान आणि राष्ट्राची शक्ती आहे. तिच्या जन्माचा अधिकार सुरक्षित ठेवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे अशी भावना आ. नमिता मुंदडा यांनी यावेळी चर्चेद्वारे व्यक्त केली.

### माजलगांव–तेलगांव बस स्थानकांमध्ये

होत असल्याचेही निदर्शनास आले. महिलांसाठी अत्यावश्यक असलेला 'हिरकणी कक्ष' उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले.आपत्कालीन परिस्थितीत मदतीची अडचण निर्माण होत असल्याचे परिषदेकडून सांगण्यात आले. याशिवाय महिला हेल्पलाईन क्रमांकाचा फलक नसल्यामुळे महिलांना तातडीने संपर्क साधता येत नाही, अशीही तक्रार करण्यात आली.महिलांसाठीचे स्वच्छतागृह बसथांब्यापासून दूर असून त्याची स्वच्छता समाधानकारक नसल्यामुळे महिला प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. तसेच बस स्थानक परिसरात खाजगी वाहनांचे मुक्त पार्किंग होत असल्यामुळे वाहतुकीत अडथळे निर्माण होत असल्याचेही पाहणीत स्पष्ट झाले. या सर्व बाबींचे जीपीएस फोटो पुराव्यासह प्रशासनाला सादर करण्यात आले असून, नवीन बस स्थानकाचे बांधकाम सुरू असले तरी तोपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात आवश्यक सुविधा व सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.या निवेदनाच्या प्रती माननीय आमदार तसेच शहर पोलीस स्टेशन, माजलगाव यांनाही देण्यात आल्या असून प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे.यावेळी माजलगाव विकास प्रतिष्ठान च्या सचिव नीला देशमुख, डॉ. वरुणराज तौर, अर्चना जाधव, ललिता सोळंके, मीना कदम, सखाराम जोशी, संतोष पालकर उपस्थित होते.

### सेल कंपनीच्या सौर उर्जा प्रकल्पाने विद्युत वितरण कंपनीची डीपी परस्पर शिफ्ट

घेण्यात आलेल्या आहेत. याच प्रकल्पाच्या मधोमध विद्युत वितरण कंपनीची एक डीपीची लाईन गेलेली होती. सदरील लाईन कंपनीने परस्पर सिफ्ट केली असून भंगारातून आणलेले लोखंडी पोल, तारा आदी साहित्य वापरून डीपी अनधिकृतपणे उभी केली आहे. हि विद्युत लाईन उभारताना खाजगी व्यक्तीला हाताशी धरून धोकादायक स्थितीत डीपी सिफ्ट केल्याने धोका निर्माण झाला आहे. या परिसरात शेतकर्यांची जनावरे ये–जा करतात. त्यामुळे, धोका होऊ शकतो. डीपी जमीनीवर व्यवस्थित बसविण्यात आलेली नाही. डीपीसह कोणत्याही पोलला मफिंग करण्यात आलेले नाही. निकृष्ट आणि बेजबाबदार काम करून कंपनीने केवळ स्वार्थ साधला आहे. त्यामुळे येथील नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. विशेष म्हणजे तारा लोंबकळलेल्या स्थितीत आहेत. पोल आणि लोखंड जुने वापरण्यात आले आहे. हा सगळा प्रकार गंभीर असून सेल कंपनीच्या व्यवस्थापकाने गेवराई येथील विद्युत वितरण कंपनीच्या विभागाला अंधारात ठेवून परस्पर डीपीची लाईन हटविल्याने संबंधित कंत्राटदारावर कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

### माजलगाव न.प.च्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत बविमो

धार्मिक उपक्रमांना चालना मिळेल, असा विश्वास नगरसेवकांनी व्यक्त केला.नगरपरिषदच्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत बहुजन विकास मोर्चा समर्थक नगरसेवकांनी आपल्या प्रभावातून मागण्या मान्य करून घेतल्याबद्दल बौद्ध समाजाच्या विविध संघटनांकडून भीमनगर,डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर,फुले नगर,सम्राट अशोकनगर, इंदिरानगर, विविध बौद्ध वस्त्यांमधून नगरपरिषदेचे व संबंधित नगरसेवकांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### बीड वकीलास मारहाण प्रकरण

याप्रकरणी तात्काळ यांच्यावर गुन्हा दाखल करून कारवाई करावी अशी मागणी करत न्यायालयाच्या कार्यालयीन अधीक्षक निवेदन देऊन धारूर तालुका वकील संघाने दिवसभराच्या कामकाजावर बहिष्कार टाकला व तात्काळ या वकिलास मारहाण करणाऱ्या आरोपीवर कठोर कारवाई करावी अशी मागणी धारूर तालुका वकील संघाच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

### आज वाणगाव फाटा येथे

दि २६ रोजीची कीर्तन सेवा महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार ज्याने आपल्या मधुर वाणीतुन महाराष्ट्र भर वारकरी सांप्रदायाची भगवी पथाका आपल्या सेवेतुन फडकवली आसे सर्व दर्शन जलाल महाराज सय्यद करजिकर नाशिक यांची होणार आहे तरीही परिसरातील सर्व भाविक भक्तांनी या किर्तन रुपी सेवेचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### मुख्यमंत्र्यांची आ.धस यांनी घेतली भेट

प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार दुसऱ्याच दिवशी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेऊन विषय मांडला. याच वेळी स्व. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर त्यांचे बंधू धनंजय देशमुख यांना जिवाला धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन त्यांना जिल्हास्तराऐवजी राज्यस्तरीय उच्च सुरक्षा द्यावी, अशी मागणीही करण्यात आली. तसेच या प्रकरणातील आरोपी कृष्णा आंधळे यांना तातडीने अटक करून दोषींना कठोर शिक्षा व्हावी, यासाठी शासनाने आवश्यक ती पावले उचलावीत, अशीही भूमिका मांडण्यात आली. या भेटीवेळी आमदार संदीप भैय्या क्षीरसागर व धनंजय देशमुख उपस्थित होते. संपूर्ण भेटीचा पुढाकार घेत सर्व विषय समन्वयाने मुख्यमंत्र्यांसमोर मांडण्याचे काम आ. सुरेश अण्णा धस यांनी केले. ठेवीदारांना न्याय व जिल्ह्यातील कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियानातंर्गत पाटोद्यात बैठक

मोहिमेद्वारे नोंदी दुरुस्ती, प्रलंबित फेरफार प्रकरणांचा निपटारा, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे आदेश वितरण, 'सर्वांसाठी घरे' योजनेअंतर्गत पट्टे वाटप, पाणंद रस्त्यांना मान्यता, क्यूआर संकेतांकयुक्त सातबारा उतारा जनजागृती, लोकसेवा हक्क कायद्यानुसार सेवा, संगणकीकृत मोजणी, शेतकरी नोंदणी प्रकल्प, पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना तसेच अकृषिक रूपांतरण प्रक्रियेतील सुधारणा आदी विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

हे अभियान, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन बीड यांच्या मार्गदर्शनाखाली पाटोदा तालुक्यात प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. प्रत्येक शिबिरानंतर अहवाल सादर करून कामकाजात पारदर्शकता राखण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. या बैठकीस नायब तहसीलदार अभय कुमार जोशी यांच्यासह महसूल विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तालुक्यातील नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

### गुतेदार आणि अभियंत्यांच्या संगनमताने

बीड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिवरापहाडी हि आदर्श शाळा आहे या शाळेच्या बाजुने संरक्षण भिंतीचे बांधकाम सुरू आहे या कामांत सिमेंट पुरेसे वापरले जात नाही जुन्या विट बाधकामावरच नविन बांधकाम करून त्यालाच थातुर मातुर प्लास्टर करुन त्यावर पुरेसे पाणी मारले जात नाही कामात मातीमिसरीत वाळु वापरली जाते आताचं भिंतीला तडे गेल्याचे दिसून येत आहे सदरील बांधकाम अंदाजपत्रका पृमाणे होत नाही गुत्तेदार आणि आभीयंता यांच्या संगनमताने सदरील बांधकाम निकृष्ट दर्जाचे होत असुन या कामांची जिल्हा परीषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहेमान हिवरा पहाडी शाळेला भेट देऊन पाहणी करणार आहेत.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

### पिंपळवंडी येथे संत गाडगेबाबा यांची जयंती उत्साहत साजरी

पिंपळवंडी दि. २५ (प्रतिनिधी) -पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथे राष्ट्रसंत संत गाडगेबाबा यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थित आणि संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तर संत गाडगेबाबा हे समाज सुधारक होते. त्यांनी आपल्या कर्तृत्वातून सर्वांना स्वच्छतेचा संदेश दिला असल्याचे यावेळी बोलताना नमूद करण्यात आले.याप्रसंगी सोपान (काका) पवार,गोकुळ राऊत,तोतरे सर,बांगर सर,प्रा.शाम पवार सर,पत्रकार के.टी. पवार,श्रीकांत उकांडे,अशोक ढांबे, बंडू पवार,मयूर राऊत आदी उपस्थित होते.

# पार्श्वभूमी

### अनिकेत लोहिया यांना डॉ.दादा गुजर समाज कार्य पुरस्कार जाहीर

अंबाजोगाई दि २५ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र आरोग्य मंडळाचा ''डॉ दादा गुजत समाज कार्य'' पुरस्कार अंबाजोगाई येथील मानवलोकचे कार्यवाह अनिकेत लोहिया यांना नुकताच जाहीर झाला. त्याचे वितरण ३ मार्च रोजी होणार असल्याचे समजते या पुरस्काराबद्दल अनिकेत लोहिया यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. मानवलोकचे संस्थापक डॉ द्वारकदास लोहिया यांनी महाराष्ट्र आरोग्य मंडळाच्या माध्यमातून ग्रामीण पुनर्निर्माणाची सुरवात केली होती. तो वारसा अनिकेत लोहिया चालवत आहेत..



## विकासाच्या संदर्भात आम्ही गावासाठी जे बोलतो तेच करून दाखवल्या शिवाय थांबत नाहीत-पेरे पाटील

किट्टी आडगाव दि २५(प्रतिनिधी)- गावचा विकास करणे म्हणजे हा काही तोंडी बोललेल्या भात पोळीसारख नव्हे, किंवा एका पंचवार्षिक योजनेमध्ये विकास होणे हे काही सोपे काम नव्हे. त्यासाठी किमान चार ते पाच पंचवार्षिक योजना घालवाव्या लागतात. प्रत्येक क्षेत्रामध्ये प्रत्येक ठिकाणी गावोगावी हे सरपंचाच्या विरोधात लोक हे असतातच लोकांच्या विरोधावर लक्ष न देता आपल्या गावचा विकास कसा करता येईल ? हे सरपंचांनी लक्षात ठेवावे त्यासाठी संपूर्ण गावाला विश्वासात घेऊन कार्य करणे चालू करावे. गाव विकासासाठी आम्ही जे बोलतो ते करून दाखवतो असे स्पष्ट प्रतिपादन पेरे पाटील यांनी केले..

माजलगाव तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय किट्टी आडगाव, यांच्या विद्यमाने आमचा गाव आमचा विकास या योजनेमध्ये मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना अंतर्गत, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने व्याख्यानात लोकसहभागातून गावाचा विकास या विषयावर छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील आदर्श गाव पाटोद्याचे माजी सरपंच भास्करराव पेरे पाटील हे प्रमुख व्याख्याते म्हणून बोलत होते .

या कार्यक्रमासाठी उद्घाटक गावचे भूमिपुत्र निवृत्त न्यायाधीश नीलकंठ देशमुख, अध्यक्ष महेंद्र गायकवाड पंचायत अधिकारी पंचायत समिती माजलगाव, प्रमुख पाहुणे संतोष गरजे ( बालग्राम संस्था संचालक गेवराई ), तसेच ग्रामपंचायत अधिकारी महेश गेंदले, सरपंच रुक्मानंद खेत्रे, उपसरपंच गोविंद आगे, डॉक्टर सुमित कदम, भगवान आगे (कृषी उत्पन्न बाजार समिती सदस्य ), माजलगाव तालुका समन्वयक वैशाली आगे सर्व अंगणवाडी सेविकासह सर्व महिला बचत गटाचे अध्यक्ष सचिव सह टाकरवन सर्कलच्या संयोगिनी सुनिता भुंबेसह गावातील महिला आणि पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना पेरे पाटील म्हणाले की गावचा विकास करण्यासाठी सुरुवातीपासूनच गावातील उघडच्या नाल्यावर त्यांना पूर्णतः बंदिस्त करावे लागते, गावात उघडच्या नाल्या असतील तर गावामध्ये रोगराई पसरण्यास तेथूनच सुरुवात होते हे प्रथमतः सरपंचांनी लक्षात घेऊन कार्य करायला सुरुवात करावी. नाल्यातील पाणी हे जमिनीत मुरून तेच पाणी गावातील आड विहिरीमध्ये जाऊन दूषित होते आणि तेच पाणी नागरिकांच्या पिण्यात आल्यामुळे रोगराई पसरण्यास सुरुवात होते, तसेच घरोघर शौचालय असावे यामुळे उघड्यावर जायचा संबंध येत नाही, आमचा गाव आमचा विकास हे पाहण्यासाठी आपण माझ्या गावाला आवर्जून भेट द्यावी. कारण आम्ही प्रत्येक घरोघर पाच हजार रुपये दर वर्षी घेऊन त्यांना सर्व सुविधा मूलभूत



सुविधा एक रुपयाही न घेता पुरवतो. त्यात महत्त्वाचे म्हणजे प्रत्येकाच्या घरोघरी चार प्रकारचे नळ,नळातून येणारे पाणी बसवले आहे त्यात फिल्टर पाणी, गरम पाणी, आणि सांडपाणी मुबलक प्रमाणामध्ये सोडतो, तसेच ग्रामपंचायत मार्फत पिठाची चक्की, गोडे तेलाची मशीन, शेवया आणि सर्व प्रकारच्या डाळी करण्याच्या मशीन, आणि महत्त्वाचे म्हणजे गावात कोण येतो आणि जातो यावर लक्ष ठेवण्यासाठी, निगराणी साठी महत्त्वाच्या ४० ठिकाणी कॅमेरे लावलेले आहेत असे माझे गाव सुजलाम सुफलाम असून तालुका जिल्हा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त असे माझे गाव असल्याचे त्यांनी सांगताना आम्ही जे बोलून दाखवतो ते केल्याशिवाय राहत नाहीत असेही त्यांनी स्पष्ट केले.

## अल्पवयीन मुलीचे अपहरण करुन बलात्कार केल्याच्या आरोपातून आरोपीची निर्दोष मुक्तता

केज दि २५ (प्रतिनिधी) -अल्पवयीन मुलीचे अपहरण करून बलात्कार केल्याच्या आरोपातून सरकार पक्ष केस सिद्ध न करू



शकल्यामुळे आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली. या प्रकरणाची थोडक्यात माहिती अशी की, दि. १ ऑक्टोबर २०२० रोजी रात्री १२ वाजण्याच्या सुमारास यातील फिर्यादीच्या मुलीचे आरोपीने अपहरण केले. व अक्कलकोट येथील अंधेवाडी येथील नितीन सुतार यांच्या रूमवर नेउन शरीर संबंध ठेवले. त्यानंतर तपासी अंमलदार यांनी मोबाईलच्या लोकेशन वरून पीडीता व आरोपी यांना तेथून पोलीस स्टेशन केज येथे आणुन पिडीतेच्या जबाबावरून आरोपीच्या विरोधात गुन्हा कलम ३७६,३७६ (२)३७६, (एफ) (एन) भारतीय दंड विधान व कलम ४,६,८, १० अन्वये गुन्ह्यात वाढ करून, पिडीतेचे मेडिकल करून व आरोपीला अटक करून तपासी अधिकारी एस. एम. काळे यांनी दोषारोपपत्र दाखल केले. सदरील प्रकरणात जिल्हा व सत्र न्यायालय केज येथील न्या. एस.बी. भाजीपाले यांच्या कोर्टा समोर सरकार पक्षाने आरोपीच्या विरुद्ध वरील आरोप सिद्ध करण्यासाठी एकूण आठ साक्षीदार फितूर न होता तपासण्यात आले.परंतु वरील आठही साक्षीदारांना आरोपी तर्फे ॲड.डी.एम. काजगुंडे यांनी केलेल्या उलट तपास व युक्तिवाद ग्राह्य धरून, सरकार पक्षाने आरोपीवर केलेले आरोप संशया शिवाय सिद्ध करू न शकल्यामुळे आरोपीची सर्व आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात आली. या प्रकरणात आरोपीच्या वतीने अँड.डी.एम. काजगुंडे यांनी काम पाहिले व त्यांना ॲड. बी. आय. चौधरी, ॲड. अक्षय इंगळे तसेच ॲड. अनिल राठोड यांनी मदत केली.

### तांदळेश्वर विद्यालयाची आरती खोसे व दिव्या जगतापचे एनएमएमएस परीक्षेत उज्वल यश

बीड दि २५ (प्रतिनिधी)- बीड तालुक्यातील तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी घाट या शाळेमधील विद्यार्थ्यांनी एन एम एम एस परीक्षेत चांगले यश मिळवले आहे.

या परीक्षेमध्ये एकूण पाच विद्यार्थी बसले होते त्यामध्ये दोन विद्यार्थ्यांनी प्राविण्य मिळवले आहे यामध्ये दिव्या गोरख जगताप व आरती गोविंद खोसे या विद्यार्थिनींनी आर्थिक दुर्बल घटक राष्ट्रीय स्तरावरील ही परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल अंधापुरी घाट व तांदळवाडी घाट या दोन्ही गावातून व पंचक्रोशीतून त्यांच्या अभिनंदन होत आहे.विद्यालयाचे प्राचार्य श्याम डाके सर्? व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी या विद्यार्थिनींना अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या...

### नगर परिषदच्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्यशी खेळताल तर महागात पडेल-खेमाडे

बीड दि २५ (प्रतिनिधी)- बीड नगर परिषद च्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्यशी खेळताळ तर महागात पडले आसा इशारा सामाजिक कार्यकर्ते



बाळासाहेब खेमाडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे .

पत्रकात पुढे नमूद केली की सध्या नगरपरिषद मधील काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कसल्याही प्रकारची सुविधा नसल्याने त्यांच्या आरोग्यास धोका आहे तरी याकडे नगरपरिषदेचे दुर्लक्ष आहे सफाई कामगार व कर्मचारी यांच्या जीवाशी खेळ थांबवा शहरात सुरू असलेल्या विविध राजकीय मोहिमांच्या आड सफाई कामगार व कर्मचारी यांच्यावर अन्याय होत असल्याचे गंभीर चित्र समोर येत आहे. स्वच्छतेच्या नावाखाली दिवस-रात्र काम करून घेतले जाते ; मात्र त्यांच्या सुरक्षिततेकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जात असल्याची खंत व्यक्त होत आहे.मोहिमेच्या नावाखाली सफाई कामगार व कर्मचारी यांना ठरलेल्या वेळेपलीकडे कधीही कामावर बोलावले जाते. साहेबांनी बोलावलं आहे म्हणून तातडीने हजर राहण्याचे आदेश दिले जातात. ही सेवा की हुकूमशाही ? असा सवाल आता उघडपणे विचारला जात आहे. सर्व सफाई कामगार व कर्मचारी यांना तात्काळ आवश्यक सुरक्षा साहित्य द्यावे कामाच्या ठिकाणी उउद्भत व स्वतंत्र चौकशी यंत्रणा उभी करून हाणामारी किंवा दबावाच्या तक्रारींची निष्पक्ष चौकशी करावी. नियमित आरोग्य तपासणी व विमा संरक्षण लागू करावे.कामाचे निश्चित वेळापत्रक पाळून अतिरिक्त कामासाठी योग्य मोबदला द्यावा.कचरा व्यवस्थापनासाठी अधिकृत जागा निश्चित करून नदीप्रदूषण थांबवावे. अशी मागणी देखील बाळासाहेब खेमाडे यांनी प्रसिद्धी पत्रकातून केली आहे..

## राष्ट्रीय युवा चेतना पुरस्काराने दिपाली राऊत सन्मानीत

चिंचोली माळी दि २५ (प्रतिनिधी)- काव्यमित्र संस्थेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज व राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंती निमित्त केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील रहिवासी कु. दिपाली सरिता राजेंद्र राऊत हिला पुणे येथे राष्ट्रीय युवा चेतना पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

याविषयी सविस्तर वृत्त अशी की, वडिलांचे छत्र हरपलेले असताना देखील न डगमगता स्वतः च्या पायावर उभारण्याची जिद्द ठेवत केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील रहीवाशी कु.



दिपाली राऊत हिने शेवग्याच्या पाल्यापासुन मोरींगा पावडर, कडीपत्ता पावडर तसेच वेगवेगळ्या प्रकारचे उत्पादन तारिणी उद्योग समुहाच्या माध्यमा तून सुरु केले आहे. आणि या उद्योग समुहाची यशस्वी वाटचाल चालू आहे. याची दखल घेऊन पुणे येथील काव्यमित्र संस्थेच्या वतीने आयोजित छत्रपती शिवाजी महाराज व राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंती निमित्त राष्ट्रीय युवाचेतना पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. या कार्यक्रमाचे मुख्य संयोजक राजेंद्र विमलाई श्रीमंत सगर संस्थापक अध्यक्ष, काव्यमित्र संस्था हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून संभाजीराजे जाधवराव (सिंदखेड राजा), राजे लखोजी जाधवराव यांचे १४ वे वंशज हे होते. व व्ही.जे. वाघमारे सर राज्याध्यक्ष-विस्तार अधिकारी पंचायत समाजकल्याण व आय. आर.डी. पी. संघटना यांच्या शुभहस्ते राष्ट्रीय युवाचेतन पुरस्कार हा मानाचा पुरस्कार तारिणी उद्योग समूहाला प्रदान करण्यात आला.

### एनएमएमएस परीक्षेत श्री.खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाचे घवघवीत यश

अंबाजोगाई दि २५ (प्रतिनिधी)- एनएमएमएस परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परीक्षेस बसलेल्या श्री.खोलेश्वर माध्यमिक विद्यालयातील १४३ विद्यार्थ्यांपकी ५१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून यात १०० च्या पेक्षा अधिक गुण ९ विद्यार्थ्यांनीयश संपादन करून विद्यालयाच्या उज्वल यशस्वी परंपरा कायम राखली आहे.या यशस्वी विद्यार्थ्यांना मेघा कुलकर्णी,लक्ष्मण काटे,अमरजा कुलकर्णी,अक्रुर यादव यांचे मार्गदर्शन लाभले.या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र अलुरकर,संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य,मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा.चंद्रकांत मुळे,खोलेश्वर शैक्षणिक संकुलातील सर्व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य,स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष डॉ.अतुल देशपांडे,कार्यवाह किरण कोदरकर,माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष अविनाश मुडेगांवकर,शालेय समितीचे सर्व सदस्य,मुख्याध्यापक अनंतराम कोपले,उपमुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे,पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे,पर्यवेक्षिका रूपाली मुळे, अभ्यासपुरक मंडळ प्रमुख श्रीकांत देशपांडे,ज्योती शिंदे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

### केज मतदारसंघात अवकाळीचा हाहःकार झाल्यामुळे आ.नमिताईंनी मुख्यमंत्र्यांकडे मागितली आर्थिक मदत

अंबाजोगाई दि २५ (प्रतिनिधी)- बीड जिल्ह्यात मागील दोन दिवसांपासून निसर्गाचा कोप पाहायला मिळाला. केज विधानसभा मतदारसंघात झालेल्या अवकाळी पाऊस, गारपीट आणि वेगवान वाऱ्यामुळे रब्बी हंगामातील पिकांचे होत्याचे नव्हते झाले आहे. या संकटात सापडलेल्या बळीराजाला तातडीने सावरण्यासाठी आमदार नमिता अक्षय मुंदडा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांच्याकडे पत्राद्वारे नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

२२ आणि २३२३ फेब्रुवारी २०२६ रोजी केज, अंबाजोगाई व बीड तालुक्यात निसर्गाचा मोठा तडाखा बसला. यामुळे रब्बी पिके: गहू, हरभरा आणि बाजरी ही काढणीला आलेली पिके पूर्णपणे आडवी झाली आहेत.फळबागा: वादळी वाऱ्यामुळे आंबा बागांचे मोठे नुकसान झाले असून मोहोर आणि फळे गळून पडली आहेत. पाऊस आणि गारपिटीमुळे भाजीपाला पिकांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. अनेक ठिकाणी मळणी करून ठेवलेले धान्य भिजल्याने शेतकऱ्यांचे कष्ट मातीमोल झाले आहेत.आधीच शेतमालाला योग्य भाव नसल्याने शेतकरी आर्थिक विवंचनेत आहे. त्यातच या अवकाळीने तोंडाशी आलेला घास हिरावला आहे. प्रशासनाने तातडीने पंचनाम्यांचे आदेश देऊन मदतीचा हात पुढे करावा. अशी मागणी केली आहे. दरम्यान आमदार मुंदडाताई यांनी आपल्या पत्रात प्रशासकीय यंत्रणेने युद्धपातळीवर पंचनामे करण्याची गरज अधोरेखित केली आहे. पावसाने भिजलेल्या पिकांची प्रत खालावल्याने बाजारभावातही फटका बसणार आहे, अशा परिस्थितीत सरकारने विशेष बाब म्हणून आर्थिक पॅकेज जाहीर करावे, अशी मागणी त्यांनी लावून धरली आहे.

### ना.अतुल सावे यांच्या वाढदिवसानिमित्त आनंदग्राम मधील मुलांना केले अन्नदान

बीड दि २५(प्रतिनिधी)- बीड तालुक्यातील पाली येथील आनंद ग्राम प्रकल्प पाली येथे ना.अतुल सावे यांच्या वाढदिवसानिमित्त एक दिवसाचे अन्नदान करण्यात आले..ना. अतुलज सावे यांचा वाढदिवस दिनांक २६ फेब्रुवारी रोजी आहे. परंतु महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुःखद निधनामुळे राज्यभर शोककळा पसरली आहे. या पार्श्वभूमीवर वाढदिवसानिमित्त कोणत्याही प्रकारचे जाहिरात बॅनर, पोस्टर किंवा होर्डिंग लावू नयेत, असे आवाहन ना. अतुल सावे यांनी केले आहे.या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत महात्मा फुले युवा दलाच्या वतीने इतर खर्च टाळून त्या अनुषंगाने आनंद ग्राम प्रकल्प पाली येथे आनंदग्राम या प्रकल्पावर एच आय व्ही ग्रस्त विद्यार्थ्यांना अन्नदान करण्यात आले.यावेळी महात्मा फुले युवा दलाचे बीड जिल्हा उपप्रमुख संजय काळे, महात्मा फुले युवा दल पाटोदा तालुकाप्रमुख गणेश मोहळकर कृष्णा दुधाळ तसेच आनंद ग्राम प्रकल्पाचे बारगजे मामा व संध्या मामी बारगजे उपस्थित होते.

## बेपत्ता मुलाच्या तपासासाठी पथक नेमल्याचा नुसता कांगावा

## ओमकार कांबळेचा तपास का लागेना ?

बीड दि २५(प्रतिनिधी)- मुलगा बेपत्ता झाला. तर या संदर्भात पिंपळनेर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा देखील दाखल झाला. तरीही पोलिसांकडून शून्य तपास होत असल्याने १४ वर्षाच्या बेपत्ता ओमकर कांबळे याचे वडील मुलाच्या शोधासाठी राष्ट्रपती पासून पोलीस अधीक्षकापर्यंत सर्वांना निवेदन देत गेले. तसे या तपासासाठी पोलीस पथक नेमल्याचे देखील नमूद करण्यात आले मात्र घटना घडवून नऊ महिने झाले तरी मुलाचा तपास काही लागलेला नाही. तपासासाठी पोलीस पथक नेमल्याचं पोलिसांनी जणू कागदोपत्री केलं आहे असा आरोप करून या संदर्भात आता दिल्लीमध्ये उपोषण करण्याचा विचार मनात आल्याचे ओमकारचे वडील सुधाकर कांबळे यांनी नमूद केले.

यासंदर्भात त्यांनी नमूद केले की १४ वर्षाचा मुलगा बेपत्ता झाल्यानंतर पिंपळनेर पोलीस ठाण्यात तक्रार दिली यासंदर्भात अर्ज फाटे केल्यानंतर कसा तरी गुन्हा दाखल झाला. तर तपास मात्र शून्य यास्तव राष्ट्रपतीकडे, खंडपीठात पोलीस अधीक्षक यांच्याकडे विनंत केल्या न्यायालयाच्या आदेशावरून बीड पोलिसांनी तपासासाठी पथक नेमल्याचे नमूद केले. यामध्ये दोन पी आय, दोन पीएसआय व कानसटटेबल एक असं पाच लोक पथकात नेमले नेमले असं देखील सांगितलं परंतु हे पथक नुसतं कागदोपत्री असल्याचा आता वाटू लागला आहे. या पथकाकडून कसलेही धागेद्वारे लावण्यासाठी प्रयत्न केले नाहीत, पथक शुन्य तपास करत आहे.राषटरपती व मानवी हक्क आयोग.विशेष पोलिस महानिरीक्षक संभाजी नगर याचं कडे विनंती अर्ज केला.यावेळीस दुसरीकडे तपास दिल्याचा नमूद केलं. यानी पण जाणुन बुजुन ओमकार याचा तपास लावला नाही. जातीयता व्यसायीक व राजकीय वास लागत असल्याने तपास करतंच नाही. यासंदर्भात.दै. पार्श्वभूमीने बातम्या छापल्यानंतर बेपत्ता मुलाच्या वर्णना सह फोटोचे पोस्टर तरी बस स्थानक मध्ये लावलं. पण हाती काही आलेलं दिसून येत नाही. सदर पथक कोणाच्या तरी दबावाखाली तपास करत नाही ना ? याची चोकशी करावी व तपास यंत्रणेकड किंवा सीबीआय व सीआयडीकडे द्यावा. अशी मागणी सुधाकर कांबळे यांनी करून आपल्या मुलाचे बरे वाईट तर झाले नाही ना अशी शंका घेत आम्ही आई वडील यांनी कसं जीवन जगावे. मुलगा बेपत्ता झाल्याची पनिशमेंट म्हणून आम्ही निषेध करत आहोत. असेही सुधाकर कांबळे यांनी नमूद केले.

### वाळू चोरीत असताना स्थानिक गुन्हे शाखेने वाहने पकडली

बीड. दि २५ (प्रतिनिधी)- बीड जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध वाळू उपसावर स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करत दोन ट्रॅक्टरसह मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बीड जिल्ह्यात वाळू घाटांचा लिलाव झाल्यानंतर काही ठिकाणी महसूल विभाग आणि स्थानिक पोलिसांच्या दुर्लक्षाने विना रॉयल्टी व विनापरवाना चोरट्या मार्गाने वाळूचा असा होत असल्याचे सर्वत्र बोलले जात असतानाच २४ फेब्रुवारी रोजी गेवराई पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या माहितीनुसार खामगाव शिवारातील नदीपात्रात छापा मारून यावेळी वाहने जप्त केली.छापा मारण्यास स्थानिक गुन्हे शाखेचे पथक गेल्यानंतर तेथे दोन ट्रॅक्टर आणि दोन केन्या आढळून आल्या. घटनास्थळी ट्रॅक्टर चालवणाऱ्या दोघांना ताब्यात घेण्यात आले तर जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची अंदाजे किंमत सुमारे १० लाख रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बांतेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली फौ. श्रीराम खटावकर, राहुल शिंदे,अर्जुन यादव, अश्फाक सय्यद,मनोज परजने आणि नितीन वडमारे यांचा सहभाग होता.

### दहिफळ ग्रामपंचायतीच्या सरपंचाची बोगस सही मारून राबवली निविदा प्रक्रिया पोलीस निरिक्षकांकडे सरपंचाची तक्रार

केज दि २५(प्रतिनीधी)- तालुक्यातील दहिफळ (वड.) ग्रामपंचायतीमध्ये .सरपंचांची बनावट सही करून निविदा प्रक्रिया राबवण्यात आल्याची गंभीर तक्रार दहिफळ (वड) च्या सरपंच सौ.अनिता शशिकांत गदळे यांनी केजचे पोलीस निरीक्षक यांच्याकडे केली आसून सबंधित प्रकाराची चौकशी करून दोषीवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.केज तालुक्यातील ग्रामपंचायत दहिफळ (वड)अंतर्गत जिल्हा परिषद शाळेमध्ये डी.पी.डी.सी निधीतून एक शाळाखोली बांधकाम मंजूर झाले होते.या कामाचा प्रशासकीय आदेश ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी प्राप्त झाला होता.या कामाची निविदा प्रक्रिया पार पडल्यानंतर संबंधिताने टेंडर प्रक्रियेस लागणाऱ्या कागदपत्रासाठी सरपंचास कसलिही कल्पना न देता सरपंचाची स्वाक्षरी पूर्णपणे बोगस केली आहे.सदरील टेंडर प्रक्रियेसाठी लागणार्या कागदपत्रांवर आपण सही केली नसल्याचे सरपंच सौ.अनिता शशिकांत गदळे यांनी पोलिस निरीक्षकांना दिलेल्या पत्रात नमूद केले आहे.तसेच त्यांनी तक्रारीत पुढेम्हटले आहे की,प्रशासकीय अधिकार्यांची यामध्ये निव्वळ फसवणूक केली आसून बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय निधीचा गैरवापर करण्यासाठीच हा अट्टाहास असून काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने सरपंचांच्या अधिकारावर गदा आणण्याचे काम या माध्यमातून केले आहे.सदरील गैरप्रकार कोणी केला,याचा योग्य तो पोलिस तपास करून सबंधित दोषी व्यक्तींवर गुन्हे दाखल करूण कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## खळेगाव संरपच सौ.पदमाबाई कर्हे यांच्या विरुद्ध अविश्वास ठराव मंजूर

खळेगाव दि २५ (प्रतिनिधी)- गेवराई तालुक्यातील खळेगाव ग्रामपंचायत निवडणूक डिसेंबर २०२२ मध्ये होऊन यात जनतेतून निवडून आलेले संरपच नऊ सदस्य व दहावा सरपंच असताना संरपच पद येताच काही दिवसांपासून संरपच हे अडानी आसल्याचा गैरफायदा घेत ग्रामपंचायत सदस्य अशोक शिंदे याने स्वतः कारभार पाहात लाखो रूपये भ्रष्टाचार केला असल्याचा सतत आरोप होत होता. यात झालेल्या मतदानानुसार अविश्वासाच्या विरोधात ३२० मतदान झाल्याने सरपंच पद जाऊन हे पद उपसरपंच आकडे आले.यासंदर्भात नमूद करण्यात आले होते की लाखो रूपये भ्रष्टाचार केल्याप्रकरणी ग्रामपंचायत उप संरपच सचिन आहेर सह सदस्य यांनी तहसील गेवराई येथे सौ.पदमाबाई शामराव कर्हे यांच्या विरुद्ध अविश्वास ठराव दाखल केला . तहसीलदार खोमने यांच्या अध्यक्षतेखाली सभा बोलवली आसता संरपच पदमाबाई शामराव कर्हे यांच्या विरुद्ध आठ/दोन आसा अविश्वास ठराव मंजूर झाला होता. परंतु संरपच पद हे जनतेतून निवडून आल्याने पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दि. २३ फेब्रुवारी २०२६

रोजी ग्रामसभांना बोलवली या ग्रामसभेत नागरीकानी गुप्त मतदान प्रक्रिया घ्या म्हणून अर्ज केला व अध्यक्ष यांनी गुप्त मतदान प्रक्रिया राबवली ११-५ पर्यंत मतदान घेतले व पाच ला निकाल प्रक्रिया सुरू केली यात विश्वास ठरावाच्या बाजूने ४०२ तर अविश्वास ठरावाच्या विरूद्ध ८२ मते पडले तर ७ मते बाद झाले. ३२० मताने ठराव पारीत होत .संरपच सौ.पदमाबाई शामराव कर्हे यांचे संरपच पदाचे सर्व अधिकार खारीस झाले व उप संरपच यांना पदभार गेला.



# घाटनांदुर रेल्वे थांबा देतो असे आश्वासन देणाऱ्या आ.धनुभाऊंना शब्दाची आठवण का येईना ?


घाटनांदूर दि.२५(प्रतिनिधी) –बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील घाटनांदुर हे गाव निजाम काळापासून रेल्वे थांबा असलेले गाव आहे. परंतु कोरोनाच्या काळामध्ये येथील रेल्वे थांबा बंद झाला त्यासाठी सतत मागणी केली. रेल्वे अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या निवेदन दिले यातच आमदार धनंजय मुंडे यांना देखील सतत निवेदन देऊन पाठपुरावा केला. त्या त्या वेळी त्यांनी रेल्वे थांबा देणारच अशी ग्वाही दिली. परंतु याला वर्ष महिने उलटून देखील त्यांना दिलेल्या शब्दाची आठवण होईना तेव्हा धनु भाऊंना शब्दांचे आठवण का येईना?



असा सवाल आता ग्रामीण भागातून केला जाऊ लागला आहे.घाटनांदुर येथील बंद झालेल्या रेल्वे थांब्यासाठी सरपंच यांनी रेल्वे बोर्डाचे सदस्य ते रेल्वे मंत्री यांच्या पर्यंत पाठपुरावा केला. मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे, मंत्री. पंकजा मुंडे, माजी खासदार प्रितम मुंडे यांनी या कडे लक्ष देण्याऐवजी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा दरम्यान परळी मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे यांनी घाटनांदूर येथे प्रचारा दरम्यान शब्द दिला होता. मला आमदार करा,मी रेल्वे थांबा देतो. मी जर रेल्वे थांबा नाही दिला, तर तोंड दाखवणार नाही. मात्र दिलेल्या शब्दाचा आ. मुंडे यांना विसर पडला आहे. त्यांना दिलेल्या कामाच्या शब्दाची का आठवण येत नाही?. घाटनांदूर च्या रेल्वे थांब्यासाठी ही जाणिवपूर्वक दुर्लक्ष का ? आसा सवाल नागरिकांना पडला आहे.घाटनांदुर येथे रेल्वेस्थानकावर जलदगती रेल्वेगाड्यांना थांबा देण्यात यावा, अशी मागणी गेल्या अनेक वर्षांपासून करण्यात येत आहे. वेळोवेळी लेखी निवेदने देऊनही या मागणीला यश येत नसल्याने नागरिकांचा लोकप्रतिनिधींवरचा विश्वास उडाला असून घाटनांदूरकरांची केवळ अश्वासनावरच बोळवण केल्याचे दिसून येत आहे. दीड वर्ष उलटूनही येथील रेल्वेस्थानकावर जलदगतीने धावणाऱ्या रेल्वेगाड्या थांबा मिळत नाही. घाटनांदुर येथील कोरोना महामारीच्या काळापासून बंद झालेला रेल्वे थांबा पुन्हा सुरू करण्यात यावा यासाठी घाटनांदुरचे सरपंच महेश आप्पा गारठे यांनी वारंवार प्रयत्न केले निवेदन दिले. रेल्वे अधिकाऱ्यांच्या सतत भेटी घेऊन निवेदन दिले परंतु या प्रश्नाकडे कोणाचेही लक्ष गेलेले नाही.घाटनांदूर चे व्यावसायिक महत्व कमी करण्यासाठी येथील रेल्वेस्थानकावर जलदगती रेल्वेगाड्यांना थांबा मिळू द्यायचा नाही. हाच मुंडे कुटुंबियांचा राजकीय डावपेच असावा अशा चर्चेला आता उधाण आले आहे.

# हमीभाव कापूस सी.सी.आय खरेदीची मुदत एप्रिल २०२६ अखेर करावी

## राजकिशोर मोदी व ॲड.विष्णुपंत सोळंके यांची मागणी





अंबाजोगाई दि २५ (प्रतिनिधी)–हमीभाव कापूस सी सी आर खरेदीची मुदत एप्रिल २०२६ अखेर करावी अशी मागणी राजकिशोर मोदी व ॲड.विष्णुपंत सोळुंके यांनी केली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री व संबंधित खात्याच्या मंत्र्यांना पाठवलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, कापूस खरेदी हंगाम २०२५-२०२६ मध्ये कापूस उत्पादीत शेतकऱ्यांचे कापसाला किमान आधारभुत किंमत (हमीभाव) योजनेत राज्यातील कापूस खरेदी अंतर्गत सी.सी.आयकडून कापूस खरेदीची अंतीम तारिख २७ फेब्रुवारी २०२६ देण्यात आलेली आहे. राज्यातील असंख्य कापूस उत्पादीत शेतकऱ्यांचा कापुस विक्रीसाठीचे सी.सी.आयचे अनेक तांत्रिक आणि नेटवर्कच्या कारणांमुळे खूप मोठा कापूस अद्याप ही विक्री करणे राहिलेला आहे. हंगाम सुरूवातीचे लांबलेल्या पावसामुळे कापूस हंगाम विस्कळीत झाला आहे. तसेच विक्रीसाठी सी.सी. आयकडेआणण्यासाठी शेतकऱ्यांनी कपास किसान ॲपवर नोंदणी करण्यासाठीची तारीख ३० डिसेंबर २०२५ ठेवली होती. असंख्य शेतकऱ्यांच्या मागणीप्रमाणे ती पुढे १५ जानेवारी २०२६ पर्यंतच करणेत आली. आजही असंख्य शेतकरी हे नोंदणी अभावी सी.सी. आयकडे त्यांचा उत्पादीत कापूस विक्रीसाठी आणु शकत नसल्यामुळे अशा शेतकऱ्यांचे खूप नुकसान होत असल्यामुळे शेतकऱ्यांना कपास किसान ॲपवर नोंदणी करणेची मुदत ही यापुढे ३० एप्रील २०२६ पर्यंत करणेत यावी. अशी मागणी महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक व पणन महासंघाचे संचालक राजकिशोर मोदी व संचालक ॲड.विष्णुपंत सोळंके यांनी केली आहे.

# ए.व्ही.महाले व उमेश वाघ यांचा गावकऱ्यांकडून सत्कार



टाकरवण दि.२५(प्रतिनिधी):–येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकचे शाखा व्यवस्थापक ए.व्ही. महाले यांची बदली झाली तर उमेश वाघ यानी नव्याने शाखा व्यवस्थापक पदाचा पदभार घेतला यावेळी ग्रामस्थांनी दोघांचाही सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.टाकरवण येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेत ए.व्ही.महाले यांनी मागील काही वर्षात शाखा व्यवस्थापक आसतांना प्रमाणिक सेवा दीली व बँकेचा आर्थीक स्तर उंचावण्यात योगदान दिले त्याबद्दल सरपंच सुनील तौर यांनी यावेळी कौतुक केले व त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या, तर उमेश वाघ यांची पद उन्नती होऊन त्यांची नूतन शाखा व्यवस्थापक म्हणून नियुक्ती झाली आहे. त्याबद्दल त्यांचा सत्कार करून पुढील कार्यास गावकऱ्यानी शुभेच्छा दिल्या यावेळी उपसरपंच दयानंद गोबरे, सहव्यावस्थापक अशिष सोळंके, रोखपाल योगेश चौधरी, ग्रामपंचायत सदस्य लक्ष्मण गरड, अशोक खुळे, जनार्धन आडागळे, महादेव कदम, गणेश सातपुते, हनुमान शेरे, नवनाथ लव्हाळे, भागवत कोरडे, बळीराम सोनवणे, रमेश आर्दड आदी उपस्थित होते.

# डॉ.बिलास काळे यांच्या बँकिंग ॲन्ड इन्शुरन्स पुस्तकाचे प्रकाशन



माजलगाव दि २५( प्रतिनिधी)–सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील वाणिज्य विभागाचे प्रा.डॉ. बिलास काळे लिखित बँकिंग अँड इन्शुरन्स' या पुस्तकाचे प्रकाशन प्राचार्य डॉ. जी. के. सानप यांच्या हस्ते संपन्न झाले. प्रा. डॉ.बिलास काळे यांचे बँकिंग अँड इन्शुरन्स' हे पुस्तक नवीन शैक्षणिक धोरणानुसार तयार करण्यात आले असून यामध्ये बँकिंग क्षेत्रातील मूलभूत संकल्पना सोप्या व सुलभ पद्धतीने मांडण्यात आल्या आहेत. तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठातील वाणिज्य विषयातील विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमासाठी सदरील पुस्तक उपयुक्त ठरणार आहे. विषयाची आवड असलेल्या सर्व विद्यार्थ्यांसाठी हे पुस्तक मार्गदर्शक ठरणार आहे. प्रकाशन सोहळ्या प्रसंगी प्राचार्य डॉ. जी. के. सानप, प्रभारी प्राचार्य डॉ. एन. के. मुळे, उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे, उपप्राचार्य प्रा. पवनकुमार शिंदे, उपप्राचार्य प्रा. प्रकाश गवते, डॉ. सचिन रुद्रवार, डॉ नितीन ढवळे, प्रबंधक डॉ. प्रशांत चव्हाण तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

# माय मराठीचा गौरव महोत्सावामध्ये बापुराव वऱ्हाडे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन



माजलगाव दि .२५ (प्रतिनिधी )– डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या २४ रोजी २०२६ मध्ये चालू असलेल्या माय मराठीचा गौरव या महोत्सवाच्या पहिल्या दिवशीच्या उद्घाटन समारंभात मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून माजलगाव तालुक्यातील मोठेवाडीचे भूमिपुत्र बापुराव वऱ्हाडे यांच्या 'शोध' कादंबरीची मीमांसा या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.मराठी भाषा व वाङ्मय विभाग आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्राचार्य, नरहर कुरुंदकर व्याख्यानमाला या माय मराठीचा गौरव महोत्सावामध्ये उद्घाटन समारंभात कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रसिद्ध लेखक व तज्ज्ञ पक्षी निरीक्षक मा. माणिक पुरी यांच्या हस्ते व छत्रपती संभाजीगरचे अपर आयुक्त कार्यालयाचे के.के.भधाने (तहसीलदार), नायब तहसीलदार मा.धावणे, मराठी विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. दासू वैद्य व विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. कैलास अंभुरे या मान्यवरांच्या उपस्थितीत बापुराव वऱ्हाडे यांच्या 'शोध' कादंबरीची मीमांसा या संदर्भ ग्रंथांचे प्रकाशन करण्यात आले. प्रस्तुत कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागाचे विभागप्रमुख प्रा.डॉ. दासू वैद्य सर यांनी केले. सुत्रसंचलन केशरचंद राठोड यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार मीरा गायके यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी मराठी विभागातील विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी, अभ्यासक, मान्यवर आणि मराठी भाषेवर प्रेम करणारे सर्व रसिक श्रोते उपस्थित होते. या सर्वांच्या उपस्थितीत बापुराव वऱ्हाडे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. त्याबद्दल त्यांचे मराठी विभागाच्यावतीने सत्कार करून अभिनंदन करण्यात आले

# सैनिकी विद्यालयामध्ये सहावीसाठी प्रवेश प्रक्रिया



बीड दि २५(प्रतिनिधी) –येथील सैनिकी विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी इयत्ता ६ वी वर्गासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. यानिमित्त प्रवेश माहिती पुस्तिकेचे विमोचन नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले माहिती पुस्तिका प्रकाशन प्रसंगी संस्था प्रशासकीय अधिकारी डॉ.व्ही.टी.देशमाने, डॉ.सुधाकर गुट्टे, सैनिकी विद्यालयाचे प्राचार्य सचिन पवार, उपप्राचार्य रविंद्र झोडगे, राजकुमार ससाणे, गणेश निर्मळ, शिवाजी सोनवणे व मेघराज कोल्हे आदी उपस्थित होते. इयत्ता ६ वीसाठी खुली तुकडी ४५ व आदिवासी तुकडी ४५ अशा एकूण ९० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे. प्रवेश पूर्व निवड प्रक्रिया इयत्ता ५ वीच्या अभ्यासक्रमावर आधारित लेखी परीक्षेद्वारे होणार असून पात्र विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो. यावर्षी इयत्ता ५ वी मध्ये शिकत असलेले विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र राहतील. प्रवेश अर्ज १० फेब्रुवारी २०२६ ते ११ एप्रिल २०२६ या कालावधीत सैनिकी विद्यालय, बीड येथे सकाळी ९ ते सायंकाळी ४ या वेळेत उपलब्ध राहतील. प्रवेश परीक्षा रविवार, दि.१२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत सैनिकी विद्यालय, बीड येथे घेण्यात येणार आहे. परीक्षेचा निकाल सोमवार दि.२० एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता विद्यालयाच्या नोटीस बोर्डवर जाहीर केला जाईल व निवड झालेल्या विद्यार्थ्यांची तोंडी परीक्षा, फिटनेस चाचणी व वैद्यकीय तपासणी दि.२३ व २४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ८ वाजता घेण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी विद्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन सैनिकी विद्यालयाचे प्राचार्य सचिन पवार यांनी केले आहे.

# गेवराई येथे पतसंस्था संचालक कर्मचारी सह.प्रशिक्षण वर्ग संपन्न



गेवराई दि २५ (प्रतिनिधी) –महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित पुणे चे सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर, जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था बीड यांच्या संयुक्त विद्यमाने गेवराई तालुक्यातील नागरी, ग्रामीण, कर्मचारी पत संस्थेतील संचालक, कर्मचारी यांच्या करिता दि.२३ ते दि. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी दोन दिवसीय सहकार प्रशिक्षण घेण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी मा. लक्ष्मीनारायण जी अट्टल चेअरमन जयप्रकाश नागरिक सहकारी संस्था मर्यादित गेवराई, तसेच कार्यक्रमाचे उद्घाटक दीपक पवळ सहाय्यक निबंधक सहकारी संस्था गेवराई यांच्या हस्ते राष्ट्रसंत श्री गाडगे महाराज यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आले. दोन दिवसीय प्रशिक्षणात पहिल्या सत्रात पी.ए. कदम सहकार विकास अधिकारी बीड जिल्हा सहकारी बोर्ड लिमिटेड बीड यांनी प्रशिक्षणार्थी ची नोंदणी व सहकारी संस्थेचे संचालक, कर्मचारी यांना सहकारी प्रशिक्षणाची गरज, हेतू स्पष्ट सांगितला तसेच दीपक पवळ यांनी तालुक्यातील सहकारी संस्थांना सविस्तर मार्गदर्शन करून कायदेशीर बाबीच्या सूचना देण्यात आल्या. त्यानंतर कर्ज वाटप व्यवस्थापन, कर्ज वसुली कलम १०१ मधील तरतुदी, पतसंस्था कामकाजाचे व्यवस्थापन या विषयावर मा. जयप्रकाश शर्मा मुख्य कार्यकारी अधिकारी वसुंधरा नागरी सहकारी बँक यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.मध्यांतर नंतर बीड जिल्ह्यातील मार्गदर्शक सहकार व्याख्याते तज्ञ मा. खोडसे सी.ए. प्रमाणित लेखापरीक्षक सहकारी संस्था बीड यांनी ठेवी सुरक्षितता, कर्ज वाटप करताना कायदेशीर बंधने, एनपीए , थकबाकी दारावर कायदेशीर कार्यवाही, पतसंस्था लेखापरिक्षण माहिती निकष, पतसंस्था एम. आय.एस. माहिती निकष, अशा विविध विषयावर सविस्तर मोलाचे मार्गदर्शन केले. दुसऱ्या दिवशी सहकार प्रशिक्षण केंद्र लातूरचे प्राचार्य बी. जे. ठोंबरे यांनी नियामक मंडळाचे संपूर्ण माहिती, तत्कालीन सहकार कायद्यातील झालेले बदल, नवीन शासकीय परिपत्रक, कायदेशीर बाबी व्यवस्थापन समितीचे कामकाज याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी दीपक पवळ सहाय्यक निबंधक सहकारी संस्था गेवराई, लक्ष्मीनारायण जी अट्टल यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन, आभार प्रदर्शन संयोजक पी. ए.कदम सहकार विकास अधिकारी बीड जिल्हा बोर्ड सहकारी बोर्ड लि. बीड यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन व यशस्वीरित्या पार पाडण्यात जयप्रकाश नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित गेवराई यांचे संचालक मंडळ, चेअरमन, सचिव, कर्मचारी वृंद यांनी मोलाचे सहकार्य केले.

# लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्रात नेत्र तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

लिंबागणेश दि २५ ( प्रतिनिधी )–बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात मंगळवार दि २४ फेब्रुवारी रोजी सूर्या नेत्रालय येथील नेत्रतज्ज्ञ डॉ. अंजली गायकवाड यांच्या सहकार्याने आयोजित केलेल्या ग्रामस्थांच्या नेत्र तपासणी शिबिरास ग्रामस्थांमधून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिराचे उद्घाटन डॉ. गणेश ढवळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, पत्रकार हरिओम क्षीरसागर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. शिबिरामध्ये मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी आपली नेत्र तपासणी करून घेतली. गरजू रुग्णांना अल्प दरात चष्म्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. तसेच डोळ्यांच्या विविध समस्यांचे निदान करून रुग्णांना योग्य उपचार व मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमामुळे ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला.शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. रुपाली चिटकुलवार, डॉ. ऋषिकेश आंधळे, डॉ. प्रमोद गोरे (सीएचओ, बोरखेड), आरोग्य निरीक्षक अशोक लोखंडे, आरोग्य सेवक वीर सापते, प्रयोगशाळा तज्ञ ऋषिकेश शेळके, औषध निर्माता जे. एस. कंचार, परिचारिका सोनाली शिंदे, व्ही. बी. भांडवलकर, एल. एच. कर्मचारी सुरेश अवसरे तसेच सेविका ज्योत्स्ना शिंदे यांनी विशेष सहकार्य केले.

# संजय कोठारी यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य निबंध व चित्रकला स्पर्धा उत्साहात



जामखेड दि २५( प्रतिनिधी)– सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांचा ६३ वा वाढदिवस ल. ना. होशिंग विद्यालय, जामखेड येथे निबंध व चित्रकला स्पर्धाचे आयोजन करून साजरा करण्यात आला .

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अरुणशेठ चिंतामणी हे होते.तर प्रमुख अतिथी म्हणून कांतीलाल कोठारी, उद्धवबापू देशमुख, प्रा. धनंजय भोसले, अशोक चोरडिया, साईप्रसाद भोसले तसेच डॉ. भरत दरकुंडे आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी मुख्याध्यापक पारखे सर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात संजय कोठारी यांच्या सामाजिक, शैक्षणिक व आरोग्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याचा आढावा घेतला.सुत्रसंचालन पर्यवेक्षक देडे सर यांनी केले. आपल्या मनोगतात संजय कोठारी यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच सामाजिक जाणीव जोपासण्याचे आवाहन केले. कार्यक्रम हा वाढदिवसानिमित्त ३ मार्च रोजी कोठारी लॉन पोलीस स्टेशन समोर सायंकाळी पाच वाजता करणार आहोत असे सांगितले.या कार्यक्रमास प्रा. राजमाने सर, कॉलेजचे प्राचार्य भोसले सर, ढाळे सर, समुद्र सर, शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रविवारी केज येथे पत्रकार संघाच्या वतीने सांस्कृतिक सोहळा व गौरव पुरस्कार वितरण

केज दि २५ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई, राष्ट्रीय पत्रकार संघ केज, पुरोगामी पत्रकार संघ तसेच सह्याद्री पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने एक मार्च २० २६ रोजी सायंकाळी पाच वाजता केज शहरातील पंचायत समिती मैदान शिक्षक पतपेढी येथे सांस्कृतिक कार्यक्रम व गौरव पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा यावेळी सन्मान करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ.सौ. सिताताई बनसोड यांच्या हस्ते होणार आहे. विशेष अतिथी म्हणून खा.बजरंग (बप्पा) सोनवणे, खा.सौ.रजनीताई पाटील तसेच आ.सौ.नमिता अक्षय मुंदडा यांची उपस्थिती लाभणार आहे. याशिवाय प्रा.सौ.संगिताताई ठोंबरे, ज्येष्ठ नेते रमेशराव आडसकर, डॉ. अंजलीताई घाडगे यांच्यासह विविध राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. राकेश गिड्डे, सागर पठाडे, डॉ. अशोक थोरात,. संतोष हंगे, राहुल सोनवणे,पठाडे, संतोष हंगे, राहुल सोनवणे, भाई मोहन गुंड, शंकर जाधव, मा. श्री. आदित्यदादा पाटील आदींसह अनेक मान्यवरांची विशेष उपस्थिती सोहळ्याला लाभणार आहे. या कार्यक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान व्यक्तींना प्रदान करण्यात येणारे गौरव पुरस्कार. उत्कृष्ट नगराध्यक्षा गौरव पुरस्कार डॉ.सौ. सिताताई बनसोड, केज भूषण गौरव पुरस्कार डॉ. हारुणभाई चाँदपाशा इनामदार, आदर्श डॉक्टर गौरव पुरस्कार डॉ. बालासाहेब अस्वले, अष्टपैलू समाज गौरव पुरस्कार हनुमंत भौसले सर यांना प्रदान करण्यात येणार आहे. तसेच उत्कृष्ट नगरसेवक गौरवपुरस्कार राजुभाई इनामदार, पैंथर भूषण गौरव पुरस्कार दिपक कांबळे, क्रीडा प्रशिक्षक गौरव पुरस्कार विनोद गुंड, उत्कृष्ट अभिनेता गौरव पुरस्कार प्रजेनजिन राहुल गायकवाड, उत्कृष्ट अधिपरीचारीका गौरव पुरस्कार ज्योती विलास आरखडे यांचाही सन्मान करण्यात येणार आहे. प्रशासकीय व पत्रकारिता क्षेत्रातील योगदानाची दखल घेत उत्कृष्ट प्रशासकीय सेवा गौरव पुरस्कार राकेश गिड्डे साहेब, पत्रकारिता जीवन गौरव पुरस्कार धनंजय कुलकर्णी, उत्कृष्ट पत्रकारिता गौरवपुरस्कार संतोष गालफाडे, पत्रकारिता संघर्ष गौरव पुरस्कार महादेव गायकवाड, निर्भीड पत्रकारिता गौरवपुरस्कार गौतम बचुटे यांना देण्यात येणार आहेत.शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा गौरव करण्यात येणार असून आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार प्रा. धनराज भालेराव, उत्कृष्ट सामाजिक कार्य गौरव पुरस्कार अरविंद थोरात, उत्कृष्ट युवा उद्योजक गौरव पुरस्कार महेश तपसे तसेच समाजसेवक गौरव पुरस्कार महादेव कराड वृद्धाश्रम यांना प्रदान केला जाणार आहे. समाजातील सकारात्मक कार्याला चालना देण्याचा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

# डॉ.गायकवाड आरोग्यरत्न पुरस्काराने सन्मानीत



बीड दि २५ (प्रतिनिधी)– स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियाना अंतर्गत राज्यातील उत्कृष्ट कार्य केलेल्या परिमंडळस्तरीय व जिल्हास्तरीय नोडल अधिकार्यांना बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार व महाआरोग्य सन्माननुसार उपसंचालक आरोग्य सेवा लातूरच्या डॉ.रेखा गायकवाड यांनाही ना.मेघना बोर्डीकर यांच्यासह इतर मान्यवर व पदाधिकार्यांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले.

राज्यामध्ये उत्कृष्ट आरोग्य सेवा पुरविणार्या संस्था, अधिकारी व कर्मचारी यांचा दरवर्षी शासना मार्फत स्व.बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार व महाआरोग्य सन्मान कार्यक्रमात गौरव सन्मान करण्यात येतो. दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर २०२५ दरम्यान स्वस्थ नारी सशक्त परिवार हे अभियान राबविण्यात आले. अभियान यशस्वीपणे राबविण्यासाठी प्रत्येक जिल्हा व परिमंडळ स्तरावर एका महिला नोडल अधिकार्याची नेमणूक करण्यात आली होती. या अभियाना अंतर्गत उत्कृष्ट कार्य केलेल्या राज्यातील एका परिमंडळ स्तरीय नोडल अधिकार्याची आणि तीन जिल्हास्तरीय नोडल अधिकार्यांची कार्यक्रमात गौरव सन्मान करण्यात आला. यामध्ये लातूर परिमंडळाच्या आरोग्य उपसंचालक डॉ.रेखा गायकवाड यांचाही काल सन्मान करण्यात आला आहे. डॉ. रेखा गायकवाड यांना उत्कृष्ट कार्याबद्दल मिळालेल्या पुरस्काराचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# जगद्गुरू तुकाराम महाराज बीजनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह



बीड दि २५(प्रतिनिधी) – तालुक्यातील पिंपळगाव मोच येथे तुकाराम महाराज मठ याठिकाणी संतश्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराज बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह व संत तुकाराम महाराज चरित्र पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक सोहळा गुरुवार दि. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रारंभ होऊन गुरुवार दि. ५ मार्च २०२६ रोजी सांगता होणार आहे.या सप्ताहात दररोज पहाटे काकडा भजन, गाथा पारायण, हरिपाठ, कीर्तन, भजन व हरिजागर असे विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. सप्ताहामध्ये विविध नामवंत कीर्तनकारांची कीर्तने होणार असून गुरुवार २६ फेब्रुवारी रोजी श्री ह.भ.प. माधव महाराज डाके, शुक्रवार २७ फेब्रुवारी रोजी श्री ह.भ.प. तुकाराम महाराज रंधवे, शनिवार २८ फेब्रुवारी रोजी श्री ह.भ.प. दुश्यंत महाराज शेळके, रविवार १ मार्च रोजी श्री ह.भ.प. सुंदर महाराज भंडारे, सोमवार २ मार्च रोजी श्री ह.भ.प. सिद्धेश्वर महाराज गाडे, मंगळवार ३ मार्च रोजी श्री ह.भ.प. गोपाळ महाराज थोटे तसेच बुधवार ४ मार्च रोजी श्री ह.भ.प. सखाराम महाराज बोबडे यांची कीर्तने संपन्न होणार आहेत.सप्ताहाची सांगता गुरुवार दि. ५ मार्च रोजी ह.भ.प. विक्रम महाराज सारुक यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार असून त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.तरी पंचक्रोशीतील भाविकभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन मधुकर महाराज आखाडे यांनी केले आहे.



माजलगाव – येथील कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयात संत गाडगेबाबा यांची जयंती साजरी करतांना कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे साहेब समवेत,लेखापाल उद्धव फपाळ,संख्याकी आधिकारी मोतीराम चव्हाण,कोषपाल मीनानाथ मुळे, निरीक्षक सुनील सवणे,वरिष्ठ लिपिक अमोल आगे, प्रतवारीकार अतुल होके,नाईक शेख रहीम व सर्व कर्मचारी बांधव.

# सावरकरांची अंदमानातील काव्य भरारी



सावरकरांचे नाव घेताच डोळ्यासमोर उभा ठाकतो ज्वालामुखी! परंतु अंदमानात कमला महाकाव्य साकारताना हा कवी शशी-शीतल झाला आहे. ''हे अधम-रक्त-रंजिते''

म्हणणारे सावरकर ''फुलबाग किती शोभे लहान नटवी करी..''असे उदगारतात हे नवलच म्हणावे लागेल. प्र.के.अत्रे म्हणतात, ''प्रत्यक्ष कालिदासच मराठीत अवतरल्याचा भास व्हावा, इतकी उपमांची सुंदर पखरण आणि शृंगाराची मनोहर खुलावट कमला काव्यात साधलेली आहे.''सावरकरांच्या हृदयाचा हा कोमल कप्पा अतिशय विलक्षण आणि विलोभनीय आहे. सावरकरांनी अंदमानच्या काळकोठडीत मरण यातना सहन करीत १० हजार ओळींचे काव्य कोठडीच्या भिंतींवर खिळे आणि काटयांच्या साह्याने साकारले. कोठडीची भिंत सावरकरांसाठी कागद झाली. इंग्रजांनी वही-पेन नाकारला म्हणुन सावरकरांनी कविता भिंतींवर लिहुन पाठ केल्या. साहित्याच्या इतिहासातील ही एक अभूतपूर्व घटना म्हणावी लागेल. अंदमानातील सावरकरांच्या निवडक कवितांचा हा आढावा!

१९११ साली सावरकरांना महाराजा बोटीने अंदमानात नेण्यात आले. पन्नास वर्षांची काळ्यापाण्याची शिक्षा सुरू झाली.कधी नारळाचा छिलका काढण्याची शिक्षा,तर कधी कोलु ओढुन ३० पाउंड तेल काढण्याची शिक्षा! वरून जेलरच्या शिव्या आणि कामात कुचराई झाली तर उघड्या अंगावर कोरड्याचे फटके, अशा मरण यातना भोगत असताना रात्रीच्या वेळी जी थोडी उसंत मिळत असे याचा सदुपयोग सावरकरांनी काव्य निर्मितीसाठी केला.कवी मनमोहन म्हणतात, भिंतच सावरकरांसाठी कागद झाली..

''आभाळ म्हणाले ''नाही'' भूमि ही म्हणाली ''नाही''।
मग विनायकाने त्यांची आळवणी केली नाही।।
पापण्यात जळली लंका लाह्यापरी आसू झाले।
उच्चारून होण्याआधी उच्चाटन ''शब्दा'' आले।।
दगडाची पार्थिव भिंत, तो पुढे अकल्पित सरली।
मी कागद झाले आहे , चल लिही असे ती वदली।।

कमला म्हणजे सावरकरांचे मास्टर पिस.कमला या महाकाव्या बरोबरच सावरकरांनी बेडी, कोठरी, सायंघंटा, निद्रे, सुत्रधारास, मरणोन्मुख शय्येवर, आकांक्षा, चांदोबा चांदोबा भागलास का? ,हलाल बिंदु, जगन्नाथाचा रथोत्सव ,रवींद्र नाथांचे अभिनंदन, अज्ञेयांचे रुद्धद्वार या कवितांचीही निर्मिती केली. त्यातील काही कवितांची चर्चा या लेखात केली आहे.

अगदी बालपणापासून महाकाव्य लिहावे अशी इच्छा सावरकरांनी मनाशी बाळगली होती. अंदमानात आल्यानंतर या इच्छेला प्रत्यक्षात आणण्याचा योग आला. कागदाचा तुकडा जरी सापडला तरी शिक्षा दिली जात असे अशा बिकट परिस्थितीत सावरकरांनी कोठडीच्या भिंतीवर कमला महाकाव्य साकारले. प्रसिद्ध साहित्यिक आणि व्याख्याते स्वर्गीय प्राचार्य राम शेवाळकर यांनी महाकाव्याची काही लक्षणे सांगितली आहेत. ती सगळी लक्षणे सावरकरांच्या कमला महाकाव्यात आपल्याला दिसून येतात. महाकवी कालिदासांशी स्पर्धा करू शकेल एवढी उत्तुंग प्रतिभा शक्ती सावरकरांची होती. ८८२ ओळींचे कमला काव्य म्हणजे सावरकरांच्या कल्पनाशक्तीचा अविष्कारच!

''फुलबाग किती शोभे लहान, नटवी, करी नटुनी थटुनी नाना नखरे वरचेवरी; हिरवाचि कधी शालु मल्मलीचा कधी, रेशमी जरतारी वा जयाच्या पदरामधी नित्य ताजे जिते मोतीपाच माणिक जन्मती; पवनेच तसे त्यांसी नटवी डुलवी किती''

सावरकर इथे म्हणतात की, ती लहान फुलबाग किती शोभिवंत दिसत होती. ती नटरंगी वारंवार नटून-थटून नाना नखरे करीत असे. कधी हिरवा शालू नेसावा तर कधी पांढरे फेक मल्मलीचा. कधी रेशमी वा जरतारी परिधान करावा. त्याचा पदरात नेहमी ताजे जिवंत मोती पाचु नी माणके जन्मत. वारा त्या पुष्प रत्नांना खुलवून डुलवी ती कुंदनच्या फुलांची बाग हसली की मदनास जिंकलेल्या शंकरासही भुरळ पडे. त्या सुगंधी,सौम्य हास्याची एक एक कला चोरून, या जगी रमणी आपले मोहक सौंदर्य पूर्णत्वाला नेतात आणि फुल आपल्या केसात खोऊन आपल्या सौंदर्यावर मुकुट चढवितात असे त्यांना वाटते. लेखक भा.ल. रानडे म्हणतात, कमलातील शृंगाराच्या डगल्याला वीर रसाचे अस्तर आहे,राष्ट्रीय विचाराची गळपट्टी आहे, हिंदू संस्कृतीचे टाके आहेत आणि कौटुंबिक बंधनाच्या गुंड्या आहेत. इंग्लंडमधून भारतात बॉम्ब आणि बंदुका पाठवणारे क्रांतिकारक सावरकर इतके कमालीचे शृंगारिक काव्य पण लिहु शकतात याचा प्रत्यय कमला वाचल्यानंतर येतो. सावरकरांच्या तरल कोमल प्रतिभेचा पल्ला पाहून खरोखरी डोळे दिपून जातात, हृदय हेलावते, मती उन्मत होते. नारळाचा काथ्या कुटताना, कोलु फिरवताना सावरकरांनी अंदमानात जीवनाचे भव्य दिव्य असे तत्त्वज्ञान मांडणाऱ्या कविता लिहिल्या. तत्त्वज्ञ सावरकरांचे दर्शन होते ते जगन्नाथाचा रथोत्सव या कवितेद्वारे. या लघु कवितेतील कल्पना खूप विशाल आणि सूचक आहेत.'' अेश्वर्य भारी श्र या अशा अेश्वर्य भारी महाराज आपली कथा ना कुठे निघे स्वारी दिक क्षितिजाचा दैदिप्य रथ तुझा सुटता ह्या कालपटाचा अतूट उतरणीवरता नक्षत्रकणांचा उठे धुराळा वरता''जगन्नाथाची दरवर्षी निघणारी मिरवणूक, रथयात्रा ही एक उदात्त व विशाल प्रतीक आहे. कवितांमध्ये जगन्नाथाच्या रथाला गतीचे अश्व जुंपले आहेत आणि काळाच्या उतरणीवरून महाराज कोठे जात आहेत असा प्रश्न विचारण्यात आला आहे. ही कविता सावरकरांच्या विशाल प्रतिभेचे उत्तुंग प्रगटीकरण आहे. अंदमानच्या कोठडीत दहा वर्ष शिक्षा भोगत असताना सावरकरांची प्रकृती सतत बिघडत असे, त्रास इतका होईल की मरण बरे असे वाटत असे. अनेकदा अंथरुणावर खिळून राहावे लागे. अशा परिस्थितीत सावरकरांनी ''मरणोन्मुख शय्येवर'' ही मृत्यूला उद्देशून कविता लिहिली. या कवितेत सावरकर म्हणतात, ''ये मृत्यू? ये तूये,यावया प्रती निघालाचि असशील जरि ये तरी सुखे''

अतिशय दीर्घ अशी २१० ओळींची ही कविता जीवनाचे सार मांडते. शारीरिक त्रास होत असताना मनात आलेले गंभीर विचार या कवितेतून व्यक्त होतात. अंदमानातून लिहिलेली आणखी एक दीर्घ कविता म्हणजे ''आकांक्षा''! एका शापित गरुड कन्येची कथा याद्वारे सावरकरांनी मांडली आहे. ''हलाल बिंदू'' या कवितेतून सावरकरांनी एका साधूने शंकराकडे केलेली प्रार्थना मांडली आहे. या संपूर्ण कवितेमध्ये प्रभू शंकराचे वर्णन आणि स्तुती केलेली आहे. १९१३साली भारतीय कवी रवींद्रनाथ टागोर यांना साहित्यातील मानाचा नोबेल पुरस्कार देण्यात आला. सावरकरांना याची वार्ता कळाल्यानंतर त्यांनी तुरुंगातून कविता लिहिली आणि पुढे ही कविता रवींद्रनाथांना पाठवली. सावरकर अंदमानात कोळसा गोळा करण्याचे काम करीत होते. या कवितेत सावरकर म्हणतात'' तोरणा देवळात जगदंबेच्या हरू ताप पुजारी तिचा लघु खंड उगाळी साचा! चंदनी झिजझिजत सहाणेवरती लघु खंड तो तुला देती घे ख्यात तोरणा प्रणती! मानुती

सावरकरांना महाकवी होऊन तोरण होण्याची इच्छा होती. पण ते म्हणतात, सहाणेवर झिजत राहण्याचे कार्य वाट्याला आले. कोणीतरी भारतीयांनी हे काम पूर्ण केले. भारतीय प्रतिभा काय आहे हे जगाला दाखवून दिले. यावर सावरकरांना समाधान वाटते. अंदमानात सावरकरांच्या कोठड्या अनेकदा बदलल्या जात असत. एकदा रात्री बदललेल्या कोठडीतून सावरकरांना चंद्रकोर दिसली आणि त्यांना बालपण आठवले. चांदोबाची गाणी मनात आली आणि त्या आठवणींना उजाळा देत त्यांनी ''चांदोबा चांदोबा भागलास का'' ही कविता लिहून पूर्ण केली. आनंदाच्या चंद्रकोरीला हसत हसत का पाहु नये असे म्हणता म्हणता सावरकर मनाच्या खोल तळाशी पोहचतात. अंदमानातील बेडी, कोठडी, आणि सायंघंटा या तीनही आशय गर्भ कविता आहेत. अंदमानच्या तुरुंगात कैदी म्हणून जगत असताना त्यांच्या हाता पायात बेड्या ठोकण्यात आल्या होत्या. परंतु या जाचक बेड्या सुद्धा एखाद्या अलंकारा प्रमाणे घासून पुसून चक्क ठेवाव्या लागत असत. या त्यांच्या जीवनातील व्यवहारिक विरोधाभासावरून त्यांना तात्विक विरोधाभास सुचला. सावरकरांनी समाजातील सात अनिष्ट रूढी सांगून त्या रुढींना सप्तशृंखला संबोधिले होते.त्या सप्तशृंखला म्हणजेच सात बेड्यांना तोडण्याचे प्रचारकी आवाहन त्यांनी समाजाला केले होते. त्या सात विधीनिषेधाच्या बेड्यांचा भावमधुर संबंध सावरकरांनी कैद्यांच्या बेडीशी जोडला आहे. या कवितेत समाजसुधारक सावरकरांच्या प्रचारकी मनोवृत्तीची चुणूक दिसून येते.

''फोडुनी तोडुनी नि। जाळावी तीच कशी उजळावी
आपण आपुलिचि। रे बेडी? हौसा तुझी वेडी सुटते ही। नचि हो ती
परि जोवरी तवरती गंजे ती तरि की श्र गांजी या अधिक आपल्या पाया
चरणासी सतत इच्छेच्या जि वेढी घडि कवण विधिनिषेधाची ही बेडी''

बेडी कडे पाहताना ती फोडून टाकण्याची सावरकरांची भूमिका आहे. मात्र प्रत्यक्ष व्यवहारात तीच बेडी उजळावी लागते हा विरोधाभास आहे.

सायंघंटा आणि कोठडी या कवितेत सावरकरांनी बंदीगृहातील उठणारे विचारांचे तरंग मांडले आहेत. सावरकर म्हणतात आपले शरीर पण एक बंदी ग्रह आहे, जशी ही कोठडी बंदी गृहआहे. कैदी मोठ्या भावना पूर्वक कोठडी साफ करीत.सावरकर प्रश्नही विचारतात कोठडी फोडावी की लिंपावी? शिक्षा,छळ यातना सहन करत असताना रात्री कोठडीत फळीवर अंग टाकले की गाढ झोप लागत असे. सावरकर म्हणतात, ''झोपेचे तेवढे भरपूर सुख मला अंदमानात मिळाले''. त्यावर त्यांनी निद्रे ही कविता रचली.

सावरकर म्हणतात , ''मी वृत्तीने कवी आणि कलावंत आहे पण परिस्थितीने मला राजकारणी पुरुष बनवले आहे'' त्यांच्या या बोलण्यातुन परिस्थितीने राजकारणी झालेल्या कलावंताचे कविमन प्रगट झाले होते परंतु या कलावंताला राजकारणातून जेव्हा-जेव्हा मोकळा वेळ मिळाला, तेव्हा मात्र त्यांच्या स्वभावातील कलावंत कवीने आपली कलाकृती साकार केली आहे. अंदमानात सावरकरांना वेळ मिळाला म्हणून त्यांनी आपला काव्य प्रपंच वाढवला आणि फुलवला.

– अंदमानातील सावरकर

**डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर**

उपप्राचार्य स्वा.सावरकर महाविद्यालय बीड.

# जनता विद्यालय धारूरचे आठ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण



किल्ले धारूर दि २५ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेचा अंतरिम निकाल जाहीर झाला असून धारूर येथील जनता माध्यमिक विद्यालयाचे एकूण ८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

डिसेंबर महिन्यात महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषदेमार्फत घेण्यात आलेल्या आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत येथील जनता माध्यमिक विद्यालयाचे एकूण सोळा विध्यार्थी परीक्षेस बसले होते त्यापैकी आठ विध्यार्थी उत्तीर्ण झाले. यामध्ये बांगर सोहम रमेश, जाधव ईश्वरी, विश्वजीत पवार,गायत्री सिरसट, ओंकार नाईकवाडे, प्रियांका लांडगे,युवराज खटके व समाधान तोंडे हे विध्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उत्तीर्ण विद्यार्थ्यांपैकी पात्र झालेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता बारावी पर्यंत १ हजार रुपये प्रति महिना याप्रमाणे १२ वी पर्यंत शिष्यवृत्ती मिळणार असून या शिष्यवृत्तीचा फायदा या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी होणार आहे.विध्यार्थ्यांच्या या यशाबद्दल प्रशालेच्या मुख्याध्यापिका सीमा गायकवाड यांनी अभिनंदन केले. यावेळी प्रशालेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत पीएमश्री आष्टा हरिनारायण शाळेच्या मुला मुलीच्या संघाचे यश



आष्टी दि.२५ (प्रतिनिधी) – शिक्षण विभाग जिल्हा परिषद बीड द्वारा आयोजित जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत आष्टी तालुक्याचे प्रतिनिधित्व करताना पीएमश्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा आष्टा हरिनारायण शाळेतील मुलांच्या व मुलींच्या खो-खो संघाने प्रतिस्पर्ध्या संघावर एकतर्फी विजय मिळवून दणदणीत विजय प्राप्त केला. या विजयामुळे आष्टी तालुक्याची मान उंचावले असून ,आष्टा ह.ना. शाळेच्या यशाने आष्टी तालुक्याला खो-खो चे दोन्ही ही विजेते पद मिळाले आहेत.

बीड जिल्हा क्रीडा संकूल च्या मैदानावर मंगळवार दिनांक २४-०२-२०२६ रोजी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, शिक्षणाधिकारी डॉ. किरण कुंवर मँडम, उपशिक्षणाधिकारी सय्यद अंजूम, अधिक्षक रंगनाथ राऊत, कँफो आबासाहेब घायाळ, क्रिडा अधिकारी विद्यागर साहेब, आष्टीचे बीईओ मोहन काकडे,यादव फल्लेवाड साहेब यांच्या उपस्थितीत या क्रिडा स्पर्धेचे उदघाटन संपन्न झाले. खो-खो च्या खेळल्या गेलेल्या मुलांच्या या विजयी संघात कँप्टन विराज परसराम आंधळे, ऋतिक संतोष घोडेस्वार, आदित्य पोपट खंदारे, ईश्वर विष्णू घोडके, महेश तात्यासाहेब माळवे ,समर्थ संजय शिंदे ,गौरव जयसिंग आंधळे ,तेजस राजेंद्र शिंदे ,ओम नामदेव आंधळे, आयुष्य सुशील राऊत, सौरभ बिभीषण गळगटे,अजय मधुकर गोपाळघरे या संघातील मुलांनी सहभाग घेतला. तर मुलींच्या विजयी संघात कँप्टन कु.तनुजा नागेश पठाडे,पंकजा सुनील आंधळे,समीक्षा संदीप रणसिंग,अक्षरा माधव गळगटे प्रांजली संतोष रणसिंग, सायली प्रदीप रणसिंग, वैष्णवी श्रीकृष्ण गळगटे, अक्षरा गणेश गळगटे, प्रांजल सिद्धार्थ रोकडे, समृद्धी राजेंद्र भवर, वैष्णवी ब्रह्मदेव आंधळे ,सोनाक्षी संदीप रणसिंग, यांनी सहभाग घेऊन यश मिळवण्यासाठी प्रयत्न केले.त्यांच्या या यशामुळे आष्टा हरिनारायण शाळा आणि आष्टी तालुक्याचे नाव जिल्हास्तरावर झळकले आहे. या संघातील विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक रघुनाथ मुटकुळे, उमेश झांबरे सर, बापू शिंदे सर, सोमनाथ वाळके सर,हेमलता तरटे मँडम यांचे मोलाचे मार्गदर्शन सहकार्य लाभले.

# नागनाथ विद्यालयाचे एनएमएमएस परीक्षेत यश

बीड दि.२५(प्रतिनिधी)- तालुक्यातील मोरगाव येथील नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी एनएमएमएस परीक्षेत यश मिळविले आहे.

सन २०२५-२६ हे या शैक्षणिक वर्षात एनएमएमएस परीक्षेत नागनाथ विद्यालय, मोरगाव या शाळेचे पंधरा विद्यार्थी प्रविष्ट झाले होते, त्यापैकी खालील सात विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले. चि.शिवम पाठक, पृथ्वीराज थोरात, संकेत सांगळे, रणजीत कागदे, कु.संस्कृती वामने, अमृता कागदे, अनुष्का धवन या विद्यार्थ्यांना चंद्रकात चाळक, सखाराम कुडके या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव, माजी मंत्री जयदत्त (अण्णा) क्षीरसागर,युवा नेते रोहित क्षीरसागर, प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, सहाय्यक प्रशासन अधिकारी योगेश पवार, कार्यवाहक राऊत एम.ए., अधीक्षक प्रकाश राठोड, नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य माटे डी.बी., पर्यवेक्षक वाणी बी. एस., यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# पिंपळनेर परिसरात अवकाळी पावसाने हरभरा, गहू, ज्वारी भिजली

पिंपळनेर : बीड तालुक्यातील पिंपळनेरसह परिसरात सोमवारी अचानक सोसाट्याच्या वाऱ्यासह विजांच्या कडकडाटात झालेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे अक्षरशः कंबरडे मोडले आहे. नाथापूर, ईट ,जवळा ,घाटसावळी,नाळवंडी सह अनेक गावांमध्ये पावसाने धुमाकूळ घातला. रब्बी हंगामातील हरभरा, गहू, ज्वारी ही काढणीला आलेली पिके भिजून मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून द्राक्ष, डाळिंब व आंबा बागांनाही जबर फटका बसला आहे.

दुपारी चारनंतर अचानक वारे सुटून पावसाने जोर धरताच शेतकऱ्यांची सर्व गणिते कोलमडली. गहू व ज्वारीची पिके जमिनीवर आडवी झाली असून दाण्याची गुणवत्ता घसरल्याने उत्पादन घटण्याची भीती निर्माण झाली आहे. द्राक्ष बागांमध्ये घड फुटणे, बुरशीजन्य रोगांचा फैलाव व गळ वाढली आहे. काढणीसाठी मजूर, वाहतूक आणि बाजारपेठेचे नियोजन करून ठेवलेल्या शेतकऱ्यांवर पावसाने आर्थिक आघात केला आहे. ज्वारी भिजली काढणीला आलेली ज्वारी अवकाळी पावसाने पूर्ण भिजली. वादळी वाऱ्यामुळे काही भागात वीजपुरवठा खंडित झाला होता .


## वारस प्रमाणपत्र जाहिर प्रगटन-नोटीस

**श्रीमती पी.जी. इनामदार, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आष्टी यांच्या न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.:३२/२०२६ (मार्फत विधिज्ञः- श्री व्ही.ए. इनामदार)

अर्जदार : **१) फरजाना बेगम भ्र. मोहोजुद्दीन काजी,** वय ७८ वर्षे, धंदा घरकाम, रा. आझाद नगर, (मिर्झा गल्ली) एम.आय.डी.सी. आष्टी ता.जि. बीड ह.मु. शंकर मंदिर जवळ, रुम नं. २४ शिवकृपा सोसायटी, वर्षा नगर, आनंद गड, पार, विकोळी वेस्ट, मुंबई. **२) शनाज बेगम भ्र. निजामुद्दीन काजी,** वय ५० वर्षे, धंदा : घरकाम, रा. सदर.

वि.निरंक

प्रकरण : मुंबई नियमन VIII, १८२७चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी नासे **काझी मोईजुद्दीन काझी हसिबुद्दीन** हे/या **दि. ०८/०३/१९९६ रोजी छत्रपती संभाजीनगर, ता.जि. छत्रपती संभाजीनगर** येथे मयत झाले / झाल्या आणि त्यांचे वरीलप्रमाणे वारस अर्जदार क्र.१ व २ यांनी कायदेशीर वारस असलेबाबतचे वारस प्रमाणपत्र मिळणेचा अर्ज केला आहे.

अर्जदार / गैरअर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

अर्जदाराचे असेही म्हणणे आहे की, त्यांना शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार / गैरअर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज **दिनांक:१६/०२/२०२६** रोजी माझी स्वाक्षरी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. **पुढील तारीख : २५/०३/२०२६**

आदेशावरुन
अधिक्षक
जिल्हा न्यायालय व स्तर आष्टी

क.लिपीक

16630



## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या कायदेशीर जाहीर प्रगटनाव्दारे कळवण्यात येते की, राजश्री विकास खांडेकर रा. मनुर ता. माजलगाव जि.बीड ह.मु.रा.तेलगाव ता. माजलगाव जि.बीड यांचा व विकास जनार्धन खांडेकर रा. मनुर ता. माजलगाव जि. बीड यांचा दिनांक ११/०६/२०२० रोजी विवाह गालेला आहे त्यांना त्यांचे वैवाहीक संबंधातुन दिनांक ०५/०५/२०२१ रोजी मुलगा विराज हा जन्मलेला आसुन त्यांचे पती पत्नीत्वाचे नाते कायम आहेत.

विकास जनार्धन खांडेकर यांना त्यांचे हिंदु एकत्रीत कुटुंबामध्ये शिवार माजलगाव ता. माजलगाव जि.बीड येथील गट नं. ३५ मध्ये जनार्धन भुजाबा खांडेकर यांचे नावे ०३ हे.९८.५० आर जमीन शिवार मौजे मनुर ता. माजलगाव ता. माजलगाव च्या हद्दीतील गट नं. २५ मध्ये जनार्धन भुजाबा खांडेकर यांचे नावे ०० हे.३८ आर, ४९ आर जमीन शिवार पवारवाभ्डी ता. माजलगाव जि.बीड च्या हद्दीतील गट नं.५४/५ मध्ये जनार्धन भुजाबा खांडेकर यांचे नावे ०० हे.४० आर जमीन व शिवार कोल्हेवाडी ता. केज जि.बीड च्या हद्दीतील गट नं. ३९/२ मध्ये जनार्धन भुजाबा खांडेकर यांचे नावे ०० हे.१७ आर जमीन आहे.

वरील नमुद केलेल्या जमीनीमध्ये राजश्री विकास खांडेकर व विराज विकास खांडेकर यांचा कायदेशीर हिस्सा असुन या जमीनी बाबत मा. दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) माजलगाव यांचे न्यायालयात वाटणी करून विभक्त ताबा मिळणे बाबत दिवाणी दावा चालु असुन त्याचा रे.दि.दा.नं. १२९/२०२५ असा आहे. करीता वर नमुद मिळकतीबाबत आमचे परस्पर कोणताही खरेदीखत दान, बक्षीसपत्र व गहाणखताबाबत व्यवहार करू नये तसे केल्यास आपल्या विरूध्द योग्य त्या न्यायालयात दिवाणी अथवा फौजदारी स्वरूपाची कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

मार्फत
अँड. आर. के. गवते,
माजलगाव

जाहीर प्रगटन देणार
**राजेश्री विकास खांडेकर**

16631/12982



## जाहीरनामा

**( वारसाचे प्रमाणपत्र बाबत जाहिरनामा)**

**मा. डी.एन.चामले, सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) माजलगांव यांच्या न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ११०/२०२६

शांताबाई विरुध्द – निरंक (मार्फत : अँड.एस.सी.शर्मा)

ज्यापेक्षा मयत **द्वारकादास उर्फ पांडुरंग पिता रामलाल दरक** हे दि. ०५/१०/२००० रोजी हे शाहुनगर, माजलगाव, ता. माजलगाव जि. बीड येथे मयत झाले आणि त्यांचा वारस अर्जदार **शांताबाई भ्र. व्दारकादास उर्फ पांडुरंग दरक,** वय-७६ वर्षे, धंदा घरकाम रा. आनंदगाव ता. माजलगाव जि.बीड ह.मु. शिवाजी नगर, माजलगाव ता. माजलगाव जि.बीड यानी कायदेशीर वारस असलेबाबतचे वारस प्रमाणपत्र मिळणेचा अर्ज केला आहे.

त्याअर्थी मयत द्वारकादास उर्फ पांडुरंग पिता रामलाल दरक यांचे वारस अर्जदार हे नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत, त्याने हया न्यायालयात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात वारस अर्जदार यांना सदरहू मयत **द्वारकादास उर्फ पांडुरंग पिता रामलाल दरक** चे कायदेशीर वारस असल्याबद्दलचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**आवश्यकता:** शासकीय व निमशासकीय, सामाजिक व खाजगी स्वरूपाच्या व किरकोळ कामासाठी.

आज **तारीख २५/०२/२०२६ रोजी** आमचे सही व न्यायालयाच शिक्यानिशी दिले.

**पुढील तारीख : ०८/०४/२०२६**

आदेशावरुन
अधिक्षक
**दिवाणी न्यायालय व स्तर माजलगाव**



email : mdbeed12@gmail.com
दुरध्वनी : ०२४४२-२२२४१९
फॅक्स : ०२४४२-२२२४१९

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**यांत्रिकी मंडळ, नांदेड**
**यांत्रिकी विभाग, बीड**

**निविदा सुचना क्र.४७ सन २०२५-२६**

खालील कामाच्या ब-१ (टक्केवारी दर) नमुन्यातील दोन पाकीटाच्या पध्दतीत मोहोरबंद निविदा कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग नगर रोड, बीड जिल्हा बीड-४३११२२ (दुरध्वनी कार्यालय-२२२४१९) यांचे तर्फे महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग यांत्रिकी संघटने अंतर्गत सबंधीत प्रकारच्या कामे करणा-या अनुभवी कंत्राटदाराकडून मागविण्यांत येत आहेत. को-या निविदा नियम व अटींच्या अधीन राहून, कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग नगर रोड, बीड यांचे कार्यालयात सुटीचे दिवस सोडून दिनांक २६/०२/२०२६ ते ०५/०३/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत दिल्या जातील व निविदा दिनाक ०५/०३/२०२६ रोजी दुपारी १७.०० वाजे पर्यंत स्विकारल्या जातील व शक्य झाल्यास त्याच दिवशी दुपारी १७.०० वाजता च्या पुढे उघडल्या जातील.

| अ.क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजीत किंमत | इसारा/बयाना रक्कम रु. (१%) | सुरक्षा ठेव रक्कम रु (२%) | निविदा संचाची किंमत रुपये | महत्वाचे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सयंत्र Tata Hitachi EX-120 No. ५१२२९ याचे अंडरकॅरेज असेब्ली उजवी बाजुचे ट्रक रोलर, चेन, बोल्ट, नट, बुश इत्यादीचे दुरुस्ती काम करणे बाबत. | २,०५,८०१/- | २,०५८/- | ४,११६/- | १०००/- + जी.एस.टी. १८% ना परतावा | कंत्राटदारास सदरील कामाचा पुर्व अनुभव असणे आवश्यक आहे. व जी एस टी नोदंणी क्रंमाक बंधनकारक आहे. तसेच इसारा / बयाणा रक्कम भरणे बंधनकारक असेल इसारा / बयाणा रक्कम भरण्यापासून कसल्याही प्रकारची सूट दिली जाणार नाही |

१. कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात सविस्तर निविदा सुचना पहावयास मिळेल विनंती केल्यास निविदा सुचनेची प्रत विनामुल्य देण्यांत येईल.
२. वरील निविदेतील दर हे निविदा उघडल्याच्या दिनांकापासून (३६०) दिवसा पर्यंत बंधनकारक राहतील.
३. को-या निविदा संचाची किंमत फक्त रोखीने स्विकारण्यांत येईल.
४. निविदा पोष्टाने मागविल्यास मोहोरबंद लिफाफा देवान घेवाण करण्यांत खराब झाल्यास किंवा निविदा अर्ज मिळण्यास कोणताही विलंब झाल्यास अथवा गहाळ झाल्यास, त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. निविदा टपालाने पाहिजे असल्यास रु.१००/ – जादा आकार पडेल.
५. जी एस टी अधिनियम अन्वये प्राप्त केलेल्या नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत प्रमाणीत करुन जोडावी.
६. कोणतीही निविदा अगर सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा / रद्द करण्याचा हक्क कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे.
७. शासनाचे नि. क्र.. मातंसं/नास्ती-२०१२/प्र.क्र.२७३/३९ दिनांक २६.११.२०१४ नुसार सदरील निविदा ई-टेंडरींग प्रनालीत समाविष्ठ होत नाही.

कार्यकारी अभियंता
**यांत्रिकी विभाग, बीड.**

जिमाका/बीड/जाहि/२०२५-२६/२७३

## आज वाणगाव फाटा येथे जलाल महाराज सय्यद करजिकर नाशिक यांचे किर्तन



मांजरसुबा (प्रतिनिधी)-गुरुनाम गुरु बंकट स्वामी महाराज याच्या आशीर्वादाने तसेच गुरुवर्य सुदाम देव बाबा यांच्या आशीर्वादाने आणि गुरुवर्य शांतिब्रह्म राम हरी बाबा यांनी चालू केलेल्या जगदुरू तुकोबाराय यांच्या बीज उत्सव या कार्यक्र माच्या निमित्ताने चालू असलेल्या कार्यक्रमांमध्ये वानगाव फाटा येथे पहिल्या दिवसाची

पान २ वर


# पार्श्वभूमी

दि.२६ फेब्रुवारी २०२६ गुरूवार




## भगवानबाबा प्रतिष्ठानवर ह.भ.प. तुकाराम महाराज मुंडे यांचे कीर्तन



बीड दि.२५ (प्रतिनिधी):- येथील श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठानवर शनिवार दि. २१ फेब्रुवारी २०२६ पासून अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे. या सप्ताहात भजन, प्रवचन, हरिपाठ, कीर्तन आणि महाप्रसाद आदी कार्यक्रम होत आहे. गुरुवार दिनांक २६ फेब्रुवारी रोजी दुपारी ४ वाजत

पान २ वर

### जिल्हापरिषदेत लोकप्रतिनिधी नसल्याने प्रशासकीय अधिकाऱ्यांचा मनमानी

# जिल्हा परिषदेच्या स्वमिळकत निधीचा होतोय हवा तसा वापर-डॉ.गणेश ढवळे

**बीड दि २५( प्रतिनिधी)– सर्वोच्च न्यायालयाने अनिश्चित काळासाठी राज्यातील उर्वरित जिल्हा परिषदेच्या निवडणुका पुढे ढकलल्या आहेत.सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे प्रशासकीय अधिकाऱ्यांची मर्जी पुढील काही महिने राहणार असल्याने अधिकारी मनमानी कारभार करत असुन जनतेच्या पैशातून अनावश्यक कामांसाठी निधी देऊन मर्जीतील कंत्राटदार पोसण्याचे काम सुरू असल्याने सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी तिव्र नाराजी व्यक्त करत अनावश्यक बाबी ऐवजी अत्यावश्यक बाबींसाठी निधी खर्च करण्याची मागणी लेखी निवेदनाद्वारे सीईओ जतिन रहेमान आणि जिल्हाधिकारी नवनित काँवत यांच्याकडे केली आहे.**



मागील काही वर्षांपर्यंत जिल्हा परिषदेच्या स्वमिळकत निधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्याने जिल्हा परिषद बांधकाम विभाग या निधीचा हवा तसा वापर करत असल्याचे निदर्शनास येत आहे. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने १० लाख आणि ७ लाख अशा दोन प्रशासकीय मान्यता दिलेल्या आहेत. यातील एका कामाचे स्वरूप पंचायत समिती आवारातील अधिकारी कर्मचारी निवासस्थानांची संरक्षण भिंत बांधणे असे आहे.या कामाची रक्कम ९ लाख ९९ हजार ८९५ रुपये इतकी आहे

पान २ वर

# स्त्री भ्रूणहत्या थांबवण्यासाठी केवळ कायदे नाही, तर समाजाचाही पुढाकार आवश्यक-आ.नमिता मुंदडा



अंबाजोगाई दि.२५(प्रतिनिधी)- राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशना मध्ये स्त्री भ्रूणहत्या या अत्यंत गंभीर आणि चिंताजनक विषयावर सभागृहात आ. नमिता मुंदडा यांनी लक्षवेधीच्या चर्चेमध्ये सहभाग घेऊन भूमिका मांडली. मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे शासनस्तरावर विविध उपक्रम राबवले जात आहेत. डिकॉय कारवाया, कठोर कायदे आणि खबऱ्यांसाठी .१ लाखांची बक्षीस योजना अशा अनेक उपाययोजना सुरू आहेत. तसेच संबंधित व्यक्तीचे नाव गोपनीय ठेवण्याची हमीही शासन देत आहे.मात्र, केवळ कायदे करून चालणार नाही, तर त्यांची प्रभावी अंमलबजावणी आणि सामाजिक उत्तरदायित्वही तितकेच महत्त्वाचे आहे. अशी सुधारित भूमिका आ. नमिता मुंदडा यांनी सभागृहात मांडली. पुढे विषय मांडताना आ. नमिता मुंदडा म्हणाल्या की, शाळा आणि महाविद्यालय स्तरापासून व्यापक जनजागृती मोहिमा राबवणे गरजेचे आहे. तरुण पिढीमध्ये स्त्री-पुरुष समानतेची जाणीव निर्माण करणे आवश्यक आहे.तसेच जिल्हानिहाय विश्लेषण करून ज्या भागात प्रमाण जास्त आहे, तिथे विशेष मोहिमा राबवणे गरजेचे आहे. व्हिस्टलेब्लॉवर प्रोटेकशन (माहिती देणाऱ्याचे संरक्षण) अधिक प्रभावी करून पुढे येणाऱ्या नागरिकांना सुरक्षितता आणि प्रोत्साहन देणे आवश्यक

पान २ वर

# सेल कंपनीच्या सौर उर्जा प्रकल्पाने विद्युत वितरण कंपनीची डीपी परस्पर शिफ्ट



गेवराई दि.२५ (बापू गाडेकर):- गेवराई तालुक्या तील देवप्रिंप्री येथील परीसरात सुरू असलेल्या सेल कंपनीच्या सौर उर्जा प्रकल्पाच्या व्यवस्थाप का ने विद्युत वितरण कंपनीची डीपी परस्पर सिफ्ट केला आहे. विद्युत विभागाची कोणतीही परवानगी न घेता भंगार दुकाना तून साहित्य आणून डीपी उभा केल्याने धोका निर्माण झाला आहे. गेवराई येथील विद्युत वितरण कंपनीच्या उपविभागीय कार्यालयाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन कंपनीवर कडक कारवाई करावी अशी मागणी येथील नागरिकांनी केली आहे. गेवराई तालुक्यातील देवप्रिंप्री परीसरात सेल कंपनीचा सौर उर्जा प्रकल्प पूर्ण झालेला असून तो पूर्ण क्षमतेने सुरू झालेला आहे. या परिसरात डोंगरालगत असलेल्या शेतजमीनीवर हा प्रकल्प सुरू करण्यात आलेला असून शेतकऱ्यांच्या जमीनी खाजगी तत्वावर

पान २ वर

# माजलगाव-तेलगाव बस स्थानकांमध्ये महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न होतोय गंभीर

## स्त्री मुक्ती परिषदेची पाहणी ;प्रशासनाला



माजलगाव दि.२५ (प्रतिनिधी)- येथील सार्वजनिक वाहतुकीत महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषद यांच्या वतीने माजलगाव व तेलगाव बस स्थानकांची पाहणी करण्यात आली. या पाहणीत अनेक गंभीर त्रुटी समोर आल्याने संबंधित प्रशासनाला तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात आगार प्रमुख, माजलगाव यांना सविस्तर निवेदन देण्यात आले आहे.

सविस्तर वृत्त असे की, पाहणीदरम्यान बस स्थानक परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याचे आढळून आले. तसेच सुरक्षारक्षक व पोलीस बंदोबस्ताचा अभाव असल्यामुळे महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त करण्यात आली. बस स्थानका तील पोलीस चौकीची अवस्था अत्यंत दयनीय असून तिचा वापर वॉशरूम म्हणून

पान २ वर

### बीड वकीलास मारहाण प्रकरण

# धारूर वकील संघाचा बहिष्कार



किल्ले धारूर दि २५(प्रतिनिधी)- बीड येथील जिल्हा न्यायालयाच्या आवारात ॲड.राम पांडुरंग डोंगरे यांना दाब दडपशाही करून त्यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्याचा विचार करणाऱ्या नागरिकावर कठोर कारवाई करावी अशी मागणी धारूर तालुका वकील संघाच्या वतीने करून कामकाजावर बहिष्कार टाकण्यात आला. बीड येथील जिल्हा न्यायालयाच्या आवारात ॲड.राम पांडुरंग डोंगरे यांना शिवीगाळ करून ट्रॉसिटी व विनयभंग दाखल करण्याचा आरोप राधाकिसन रामचंद्र करपे यांनी व इतर पाच ते सहा जणांनी घातला व त्यांना मारहाण केली.

पान २ वर

### मुख्यमंत्री फडणवीस यांची आ.धस यांनी घेतली भेट

# ठेवीदारांना न्याय व देशमुख कुटुंबास उच्चस्तरीय सुरक्षेची केली मागणी



पाटोदा दि.२५(महेश बेदरे):- आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे आ.सुरेश धस यांनी बुधवार, दि. २५ फेब्रुवारी रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील महत्त्वाच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. विशेषतः बहुराज्यीय पतसंस्थांमधील गैरव्यवहारामुळे अडचणीत सापडलेल्या ठेवीदारांना न्याय मिळवून देण्याबाबत तसेच स्व. संतोष देशमुख प्रकरणानंतर त्यांच्या कुटुंबास उच्चस्तरीय सुरक्षा देण्याबाबत ठोस मागण्या करण्यात आल्या.

बीड जिल्ह्यात व मराठवाड्यात अनेक बहुराज्यीय पतसंस्थांमधील गैरव्यवहारामुळे हजारो ठेवीदारांची आयुष्यभराची बचत अडकून पडली आहे. कष्टाचे पैसे गमावलेल्या कुटुंबांवर आर्थिक संकट कोसळले आहे. शासनाने तातडीने हस्तक्षेप करून ठेवीदारांना न्याय देण्यासाठी विशेष यंत्रणा उभारावी व संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आ. धस यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली. यावर लवकरच बैठक घेऊन निर्णय करण्यात येईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्याची माहिती मिळाली.

दरम्यान, मंगळवार दि. २४ फेब्रुवारी रोजी बीड जिल्ह्यातील विविध पतसंस्थांच्या ठेवीदारांनी मुंबई येथील आझाद मैदानात येथे सचिन उबाळे यांच्या मार्गदर्शनाखाली आंदोलन केले होते. त्या वेळी आ. सुरेश धस यांनी आंदोलनस्थळी भेट देत मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन

पान २ वर

### गुतेदार आणि अभियंत्यांच्या संगनमताने

# हिवरापहाडी शाळेच्या संरक्षण भिंतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे



बीड दि.२५(प्रतिनिधी):-तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिवरापहाडी हि आदर्श शाळा आहे सध्या या शाळेच्या संरक्षण भिंतीचे बांधकाम सुरू असून जुन्या विट बाधकामावरच नविन बांधकाम करून त्यालाच थातुर मातुर प्लास्टर करुन त्याला पुरेसे पाणी मारले जात नाही कामात पुरेसे सिमेंट टाकलें जात नाही मातिमिसरीत वाळु वापरली जाते गूतेदार आणि अभियंता यांच्या संगनमताने सदरील बांधकाम निकृष्ट दर्जाचे होत आहे या कामाची चोकशी होनार असुन हिवरापहाडी शाळेला जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहेमान भेट देऊन पाहणी करणार आहेत. या बदल अधिक माहिती अशी की

पान २ वर

### छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियानातंर्गत पाटोद्यात बैठक

# प्रलंबित महसुली प्रश्न तात्काळ मार्गी लावणार-तहसीलदार



पाटोदा दि.२५(प्रतिनिधी):- शासनाच्या महसूल व वन विभागाच्या निर्णयानुसार इशशव जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान (टप्पा क्रमांक १) अंतर्गत पाटोदा तालुक्यातील तयारीचा सविस्तर आढावा घेण्यासाठी बुधवार, दि. २५ फेब्रुवारी रोजी तहसील कार्यालयात बैठक संपन्न झाली.

यावेळी तहसीलदार दत्तात्रय निलावाड म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियानाच्या माध्यमातून नागरिकांचे प्रलंबित महसुली प्रश्न तात्काळ मार्गी लावले जातील. महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक व वेगवान करण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. त्यांनी शिबिरांचे सुयोग्य नियोजन करून प्रत्येक पात्र लाभार्थ्यापर्यंत सेवा पोहोचविण्याच्या सूचना दिल्या. बैठकीत भोगवटदार वर्ग-२ जमिनींचे वर्ग-१ मध्ये रूपांतर, 'जिवंत सातबारा'

पान २ वर

# केज मतदार संघात अवकाळी पावसामुळे झालेल्या शेती नुकसानीबाबत तात्काळ पंचनाम्याची मागणी



केज दि २५(प्रतिनिधी)- मतदार संघातील अंबाजोगाई, केज व नेकनूर परिसरातील अनेक गावांमध्ये मागील दोन-तीन दिवसांपासून वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसात काही ठिकाणी गारपीट झाली आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी बांधवांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे. तेव्हा केज मतदार संघातील अवकाळी पावसामुळे झालेल्या शेती नुकसानी बाबत तात्काळ पंचनामे करावेत अशी मागणी माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी केली आहे. या अवकाळी पावसामुळे रब्बी हंगामातील गहू, ज्वारी तसेच इतर रब्बी पिके पूर्णपणे आडवी पडून जमीनदोस्त झाली आहेत. अनेक शेतकऱ्यांच्या फळबागा व भाजीपाला पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतामध्ये पाणी साचल्यामुळे उभ्या पिकांचे कुजणे व उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आधीच वाढलेल्या शेती खर्चामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत असताना या नुकसानीमुळे त्यांची परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. मतदार संघातील अंबाजोगाई, केज व नेकनूर परिसरातील अनेक गावांमध्ये मागील दोन-तीन दिवसांपासून वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसात काही ठिकाणी गारपीट झाली आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी बांधवांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे. तेव्हा केज मतदार संघातील अवकाळी पावसामुळे झालेल्या शेती नुकसानी बाबत तात्काळ पंचनामे करावेत अशी मागणी माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी केली आहे. महाराष्ट्र शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन नियमांनुसार व नैसर्गिक आपत्ती मदत निकषांप्रमाणे सदर नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने खालील मागण्या करण्यात येत आहेत.तरी संबंधित महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत तात्काळ संयुक्त पंचनामे करण्यात यावेत.नुकसानीचा सविस्तर अहवाल शासनाकडे तातडीने सादर करण्यात यावा अशा पाच मागण्याचे निवेदन माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्यावतीने उपजिल्हाधिकारी कार्यालयात देण्यात आले.

# पत्रकार नाईकवाडे यांच्या वाढदिवसानिमित्त सफाई कामगारांना साडीचे वाटप



चौसाळा दि.२५(प्रतिनिधी):- तालुक्यातील चौसाळा येथील पत्रकार संघटनेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य विकास नाईकवाडे यांच्या वाढदिवसा निमित्त चौसाळा येथील ग्रामपंचायतीच्या सफाई कामगार महिलांना साडीचे वाटप करण्यात आले .

पत्रकार विकास नाईकवाडे यांचा वाढदिवस प्रत्येक वर्षी विविध उपक्रमांनी साजरी केला जातो याहीवर्षी अवाजवी खर्चाला फाटा देत सामाजिक उपक्रम राबवत चौसाळा ग्रामपंचायत कार्यालयामध्ये साडी चे वाटप करण्यात आले यावेळी चौसाळा शहराच्या सरपंच सौ मंगल प्रेमचंद लोढा , ज्येष्ठ नेते प्रेमचंद उर्फ बाबू शेठ लोढा ग्रामपंचायत सदस्य सौ विजया किशोर ढोकणे , सौ ज्योती बाबासाहेब जाधव , सौ आशा अंकुश सोनवणे , सौ पल्लवी सुरेश तोडकर , सौ शमा अजाउद्दिन शेख , सौ सायरा इस्माईल शेख व ग्रामपंचायतचे कर्मचारी उपस्थित होते.

# माजलगाव न.प.च्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत बविमो समर्थक आंबेडकरवादी नगरसेवकांची प्रभावी मागणी

## शहरातील आंबेडकर स्मारक व बौद्ध विहाराच्या कामांना मंजुरी

माजलगाव दि.२५(प्रतिनिधी):- नगरपरिषदेच्या नव्या कार्यकाळातील पहिल्याच सर्वसाधारण सभेत बौद्ध समाजातील चारही नगरसेवकांनी मांडलेल्या मागण्यांना प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला. परिणामी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक तसेच बौद्ध विहाराच्या विकासकामांना अधिकृत मंजुरी देण्यात आली.दरम्यान बाबुराव पोटभरे यांच्या बहुजन विकास मोर्चाचे समर्थक चारही नगरसेवकांची मागणी या निमित्ताने प्रभावी ठरली असल्याची बौद्ध समुदायात चर्चा आहे.

शहरातील भीम नगर येथील स्मारकासाठी ३० लक्ष रुपये , गौतम नगर १५ लक्ष रुपये,फुले नगर बुद्ध विहारास २० लक्ष रुपये, अशोक नगर येथे बुध्द विहारास १५ लक्ष रुपये,पंचशील नगर येथील स्मारकांला १५ लक्ष रुपये,इंदिरा नगर येथील आंबेडकर स्मारकासाठी १५ लक्ष रुपये व आंबेडकरनगर ला १५ लक्ष रुपये अशा विषयांचा ठराव बहुजन विकास मोर्चाचे समर्थक नगरसेवक अभिजीत पोटभरे,नगरसेविका सुलोचनाताई प्रधान,उज्ज्वलाताई जावळे,उषाताई लांडगे.यांनी सभागृहात मांडला.तसेच माजलगाव शहरातील भोगवटदारांना त्यांच्या हक्कांच्या पिटीआर व घरकुल योजनेचा लाभ देण्यात यावा.असा प्रश्न नगर सेवक अभिजित पोटभरे यांनी सभागृहात उपस्थित करून ठराव मंजूर करून घेतला.शहरातील बौद्ध समाजाच्या धार्मिक व सामाजिक गरजांचा विचार करून ही मागणी सभेत ठामपणे मांडण्यात आली होती. सभागृहात या विषयावर सविस्तर चर्चा झाल्यानंतर सर्व सदस्यांच्या संमतीने सदर प्रस्ताव मंजूर करण्यात आला.या निर्णयामुळे बौद्ध समाजात समाधान व्यक्त करण्यात येत असून,अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या कामांना अखेर गती मिळणार आहे. दरम्यान बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुरावजी पोटभरे यांच्या मार्गदर्शनाखाली आंबेडकर स्मारक व बौद्ध विहाराच्या विकासामुळे सामाजिक,सांस्कृतिक आणि

पान २ वर

CMYK